# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख २० माहे सप्तेंबर सन १८८० इसवी अंक ३७

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |

डाक हाशील.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केले जाईल

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढे दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## नोटिस

बनाम बचुलाल कासीराम रहाणार व्याळें तालुके बाळापुर यांस व सर्व लोकांस देण्यांत येत आहे कीं, बचुलाल यानीं पांच रुपयांचे स्टांपावर मुखत्यारपत्र मजपासून लिहून घेतलें होतें. परंतु त्या मुखत्यारपत्राप्रमाणें बचुलाल हा वागला नाहीं व त्यानें पुढें माझे तर्फे कोणतेंही काम करावें असी माझी इच्छा नाहीं. यास्तव तें मुखत्यारपत्र मी रद्द केलें आहे. सदर्हू मुखत्यारपत्राचे आधारें बचुलालजी यानीं कोणतेंही काम केलें असतां मला मंजूर नाहीं. हें बचुलाल यास व सर्व लोकांस जाहीर व्हावें, कळावें. तारीख १२ सप्तंबर सन १८८० इसवी.

( सही ) सोनाजी कुकाजी तेली
रहाणार ताजनापेठ अकोलें
दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार.

या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

विनंती विशेष, रा० रा० गणेश वासुदेव जोशी हे परलोकवासी झाले हें आपल्यास माहित असेलच, ते अनेक सार्वजनिक कामांत पुढारी असून त्यांणीं आपल्या देशाचे कल्याणाकरितां नाना प्रकारचे यत्न केले. त्यांचे स्मारक कृत्य करण्याकरितां तारीख ८ आगष्ट सन १८८० इसवी रोजीं पुण्यांस सर्व लोकांची मोठी सभा होऊन सुमारें दोन हजारांचे वर्गणीचे आंकडे पडले असून आणखी वर्गणी जमविण्याचें काम चालू आहे. सदर्हू वर्गणीचा उपयोग कोणत्या प्रकारें व्हावयाचा याजबद्दल व्यवस्थापक मंडळीनें केलेला ठराव या सोबत आपले अवलोकनार्थ पाठविला आहे, आपण आपले तिकडील मंडळीस सदर्हू हकीकत कळवून सार्वजनिक कृत्यास यथाशक्ति मदत करण्याची तजवीज केली पाहिजे. हें काम सार्वजनिक असून आह्मास मंडळीनें सांगितल्यावरून आपणास लिहिण्यांत येत आहे, सबब या कामीं आपलेकडून व आपले मित्र मंडळीकडून चांगली मदत होईल अशी आशा आहे. सर्व ठिकाणीं जमलेली वर्गणी एकत्र केल्यास व्यवस्थापक मंडळीनी योजलेलें स्मारककृत्य चांगले प्रकारें करतां येईल, व तें चिरकाळ राहील, आणि प्रत्येक ठिकाणीं जर वेगळें वेगळें स्मारक कृत्य करण्याचें मनांत आणलें तर कोणचेंच चांगल्या प्रकारें शेवटास जाणार नाहीं, व तसें झालें म्हणजे आपण त्यांचें चिरकाल नाव रहाण्याची तजवीज केली नाहीं असा मात्र दोष येईल. सबब आपल्या तिकडे जी काय रक्कम जमेल ती इकडे रवाना होण्याची मेहरबानीनें तजवीज करावी. तारीख १२ माहे सेप्टेंबर १८८०.

माधवराव यशवंत रास्ते,
शिवराम हरी साठे,

### ठराव.

कैलासवासी गणेश वासुदेव जोशी.
यांचे स्मारकफंड कमिटीचे सेक्रेटरी.

कैलासवासी गणपतराव जोशी यांचें स्मारक कृत्य करणें तें पुणें शहरांत एक मोठी इमारत बांधून तींत सार्वजनिक सभेचें आफिस राहून कलाकौशल्यास उत्तेजन देण्याकरितां एक शाळा ( Industral Institution ) स्थापण्याची सोय होईल असें करावें. कलाकौशल्याची शाळा स्थापणें ती आनरेबल सर मंगळदास नथुभाई व आनरेबल मुरारजी गोकुळदास व रावबहादुर गोपाळराव हरी देशमुख वगैरे. अनुभवशीर गृहस्थांचे विचारें स्थापन करण्यांत येईल.

---

मूर्तिजापुर ता. १०।९।८०

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—वि. वि.

सुमारें एक महिन्यापासून पर्जन्य पडत नव्हता यामुळें लोक फार हवालदील झाले होते. पर्जन्य पडण्यासाठीं ब्रह्मवृंदानीं महादेवास विठोबास पुष्कळ वेळा अभिषेक वगैरे करून स्तविलें, नामसप्तेंही झाले परंतु त्यावेळीं ईश्वरानें कृपा केली नाहीं पण तारीख २।९।८० रोजीं सर्व रात्री भीज पाऊस पडला नंतर परवाचे दिवशींही रात्री दोन आणि तीन वाजण्य च्या सुमारास चांगला पर्जन्य पडला व आजही या गांवच्या आसपास पुष्कळ पडत आहे व एथेंही पडण्याचा संभव आहे पर्जन्य आणखी आठ चार दिवस पडला नसता तर धान्य फार महाग झाले असतें व गावांत चोऱ्याही फार होत्या. गेल्या बाजारीं दोन शेरीं पायलीनें ज्वारी ९ पैशाप्रमाणें व गहू १०।११ पैशाप्रमाणें विकले. आज तीच ज्वारी सात पैशा पायली प्रमाणे व गहू ९ पैशा पायलीप्रमाणें विकली गेली. पर्जन्य पडल्यानें लोकांस इतका आनंद झाला आहे कीं तो लिहितां पुरवत नाहीं. या तालुक्यांत चोहोंकडे पर्जन्य पडल्याची बातमी आहे. ज्वारीच्या पिकांस बराच फायदा झाला आहे कुणबी लोक म्हणतात कीं, कपाशी मात्र आठ बारा आणे पूर्वीच पर्जन्य नसल्यामुळें जळून गेली असें ऐकतों.

एथील सरकारी सर्व शाळांचें काम तूर्त चांगलें आहे. स्कूलकमिटीतील सर्व मेंबर लोकांचें लक्ष एथील हेड मास्तर यांणीं विद्येकडे उत्तम प्रकारें वळविलें असून तें सांगतील तशा प्रकारें कमिटी मदत देत आहे याबद्दल पुष्कळवेळा मे० डिपुटी कमिशनर साहेब व राव बहादूर डायरेक्टर साहेब यांणीं आभार मानिले आहेत. व त्यांची स्तुती केली आहे. नवीन मुलींच्या ज्या दोन शाळा झाल्या आहेत त्या प्रत्येकीस दर महा १५ रुपयेप्रमाणें खर्च आहे. मराठी शाळेचा खर्च रा० रा० विश्वनाथ आत्माराम भडंग व जोरावर सिंग किसनसिंग हजारी हे तीन तीन महिने पावेतों देणार व पुढें निरंतर पांच रुपये दर महा देणार (बाकी सरकारांतून मिळण्याविषयीं अर्ज केला आहे.) तसेंच हिंदुस्थानी शाळेचा खर्च सहा महिने रा० रा० अमृतराव देशमुख हे देणार व पुढेंही ते पांच रुपये निरंतर देणार आहेत. दोन्ही शाळांस सरकारांतून मदत मिळण्याविषयीं अर्ज झाले आहेत.

एथील मुसलमान लोकांनीं थोडे दिवसांपूर्वीं एक मसजीद नवीन (वर्गणी जमा करून करून) केली आहे त्या ठिकाणीं सालअखेरचे रमजान महिन्यांत एथील डाक्टर मि० हसमत अली यांणीं आपले चिरंजीवास मलका पुराहून आणवून त्याचेकडून कुराण महिनाभर पढविलें. सदर्हू इसमाचें नाव याकुबखान हें आहे. याचें वय सुमार १८ । २० वर्षांचें असून हा हफीस झाला आहे. व याला पारशीयन चांगलें कळतें. सालमजकूरचे रमजान महिन्यांत मसजीदींत जंगी रोशणाई जशी झाली व निमाज झाले तसे सुमार २५ वर्षांत झालें नाहींत असें मुसलमान लोक म्हणतात. रमजानचे २७वे तारखेस डाक्टर यांणीं मुसलमान लोकांस मोठा खाना सुमार ३००। ४०० लोकांस दिला.

तूर्त आमचे गावांत महत्वाचा तंटाबखेडा कांहींएक नसून शांतता आहे. रा. रा. रामराव गोविंद ऊर्फ भाऊ साहेब एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर व मे० दोराबजी साहेब तहशिलदार यांच्या सुस्वभावामुळें लोकांचे न्याय उत्तम प्रकारें होतात. व गावांतील द्वेष कमी होत चालला असून लोक आनंदांत आहेत. कळावें.

एक ग्रामस्थ.

---

वऱ्हाडसमाचार.

मिति भाद्रपद कृष्ण २ शके १८०२

## जुडिशियल खात्याचा रिपोर्ट.

वऱ्हाडचा सन १८७९ सालचा जुडिशियल खात्याचा रिपोर्ट आह्माकडे आला आहे त्यांतील माहिती आह्मी आपले वाचकांस कळवितों.

### फौजदारी शाखा.

वऱ्हाडांत फौजदारी कामासाठीं न्यायाधिकारी या वर्षी आहेत तेः—

| | |
|---|---|
| जुडिशियल कमिशनर | १ |
| फर्स्ट क्लास माजिस्ट्रेट | १७ |
| सेकंड ,, ,, | [illegible] |
| थर्ड ,, ,, | २४ |
| स्पेशियल माजिस्त्रेट | १४ |

या सालांत १००८३ गुन्ह्यांचे रिपोर्ट झाले. मागिल सालीं १८०१७ झाले होते. सालमजकुरच्या गुन्ह्यांत पोलिसाचे अधिकारांतील १४१७८ यांपैकीं रजिस्टरांत गाळाऊ झाले १०१३, व बाकी ८१७१ चौकशीस आले. व त्यांत ११७४२ आरोपी होते. पोलिसचे अधिकाराबाहेरील गुन्हे १४०१ त्यांत गाळाऊ झाले ११ व चौकशीस आले १२९७यांत आरोपी १०१९४ होते. अधिकाराबाहेरील गुन्ह्यांची इतकी संख्या मागील ५ वर्षांत नव्हती.

या सालांत गुन्हे घडले १७००९ यांत शेकडा ६८॥ पोलिसाचे अधिकारांतील व ३१॥ अधिकाराबाहेरील होते. चौकशीस गुन्हे १३४९२ आले. गुदस्त सालीं ११४१४ आले होते या सालीं आरोपी २१९३६ असून गुदस्त १९४०६ होते. या सालांत मालमत्तेविरुद्ध गुन्हे अधिक झाले व महागाई आणि गरीब लोकांची विपत्ती हें यांचें कारण आहे. साधारण सर्व लोकांचे आरोग्याविरुद्ध अपराध या सालीं कमी झाले. सन १८७८त महामारीचा उपद्रव झाला होता त्याकरितां लोकांकडून स्वच्छता बरी ठेवली गेली ही संतोषाची गोष्ट आहे.

या सालांत खून २६ झाले गुदस्त सालीं १७ झाले होते. डाके गुदस्तपेक्षां या सालीं २१ अधिक झाले. वणजारी लोकांनीं साल मजकुरीं २३९ गुन्हे केले. गदस्ता १८२ केले होते. सालमजकुरीं वणजारी आरोपी ६३५ होते त्यांतून ४७१ लोकांनां शिक्षा झाल्या. वणी व वाशिम जिल्ह्याचे डिपुटी कमिशनरांनीं लिहिलें आहे कीं महागी

मुळें वणजारी लोकांची स्थिति वाईट झाली आहे.

अपराधाची शाबिदी होण्याचें मान गुदस्तां शेकडां ६०॥ या वर्षी ६१ आहे. कोणकोणत्या अधिकाऱ्यांनीं किती किती मुकदमे केले ते:—

| | मुकदमे. |
|---|---|
| १ डिपुटी कमिशनर | ६११ |
| १३ असिस्टंट कमिशनर व अव्वाचीं | ११२६ |
| ८ एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर | ८७९ |
| १२ तहशिलदार | ५५५४ |
| २० नायब तहशिलदार | ११३६ |
| १५ स्पेशियल माजिस्त्रेट | १०१० |

उमरावती डिपुटी कमिशनरांनीं लिहिलें आहे कीं इतर कामें आपल्याकडे पुष्कळ असल्यामुळें फौजदारी काम ज्यास्ती झालें नाहीं. हलक्या जिल्ह्यांतूनही फौजदारी काम कमी होतें तें अधिक होत जावें अशी गेल्या वर्षी सूचना होती पण सालमजकुरीं वाशीम जिल्ह्यांत मागच्या पेक्षांही कमी काम झालें. त्याविषयीं मि. नौलिस साहेब यानीं लिहिलें आहे कीं आपलेकडील कामें फार भानगडीची होतीं ह्मणून कमी झालीं.

असिस्टंट कमिशनर व एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं मागील सालच्या दिढीनें या वर्षी काम केलें.. तहशिलदारांकडून जें फौजदारी काम झालें आहे तें दर इसमी २९१ किंवा दरमहा २१ मुकदमे या मानानें झालें आहे सबब फार ह्मणण्यासारखें नाहीं. स्पेशियल माजिस्त्रेटांनीं काम अधिक केलें आहे. खोलापुरच्या स्पेशियल माजिस्त्रेटानीं एका मुकदम्यांत कडक शिक्षा दिली होती तिजबद्दल ज्युडिशियल कमिशनर साहेबानीं त्यास टपका दिला आहे. व त्या स्पेशियल माजिस्त्रेटचे कामाची मुदत भरली ह्मणजे त्याचें काम कोणत्या तऱ्हेचें झालें याविषयीं रिपोर्ट करावा असें उमरावतीचे डिपुटी कमिशनरास लिहिलें आहे. कांहीं स्पेशियल माजिस्त्रेटांचीं कामें रिपोर्टांत नमूद केली आहेत तीं:—

| | मुकदमे. |
|---|---|
| मि० फत्ते अली | ४६८ |
| ,, नासरुद्दीन | २४२ |
| ,, मारुती कडताजी | २२१ |
| मि० नारायण केशव | २१८ |
| ,, व्यंकटराव | १३१ |
| ,, खाजे वहरुद्दीन | १२४ |

समरी ट्रायल ह्मणजे जुजबी चौकशीनें निकाल करावयाचे ते मुकदमे कोणते जिल्ह्यास किती झाले त्यांचें ठिपणः—

| | | | |
|---|---|---|---|
| अकोला | १९१ | उमरावती | ११ |
| बुलढाणा | १५८ | इलिचपुर | ११४ |
| वाशीम | ४८ | वणी | ११ |

मागील सालापेक्षां या सालीं हे मुकदमे ५१४ अधिक झाले. व असे चौकशीची संख्या वाढत जावी हें या प्रांतास इष्ट आहे. यांपैकीं ७७ मुकदम्यांचें ४ डिपुटी कमिशनांनीं निकाल केले ते कोणी किती केले तें:—

| | |
|---|---|
| इलिचपुर डिपुटी कमिशनर | ३४ |
| अकोला ,, | ३३ |
| उमरावती ,, | ५ |
| वाशीम ,, | ५ |

मि० डनलप साहेब यानीं या प्रकारचे फैसल फार अधिक केले. ह्मणजे २०३ समरी ट्रायल त्यांनीं एकट्यांनीं केले.

ज्युडिशियल कमिशनराकडे मुकदमे २७ व त्यांत आरोपी ४३ आले होते. त्यांतून दोघांस मृत्यूच्या शिक्षा झाल्या. १८ जणांस काळेपाण्याच्या शिक्षा, ८ जणांस इतर शिक्षा, व १५ जणांपैकीं कांहीं मेले व बाकीच्यास सोडून दिले. काळेपाण्याच्या १८ कैदी पैकी ७ जणास ज्युडिशियल कमिशनर साहेबानीं फाशीची शिक्षा ठरविली होती पण रेसिडेंट साहेबानीं ती बदलून काळेपाण्याची ठरविली.

ज्युडिशियल कमिशनर साहेबापुढें आरोपी आल्यांत खुनाचे व खुनास प्रयत्न केल्याचे १९, डाक्याचे २१, दुखापतीचे २ व रात्रीचे घरफोडीचा १ होता.

फौजदारी कोर्टांत ४२४१३ लोकांच्या साक्षी झाल्या. व१०९६४ लोक साक्षीकरितां आले असतां त्यांच्या साक्षीचें कारण पडलें नाहीं सबब ते परत गेले.

डिस्ट्रिक्ट माजिस्त्रेटाकडे खालील न्यायाधिशाचे ठरावावर अपिलें १३९ झालीं त्यांतील १२८ चें त्यांनीं फैसल केले. त्यांत २९ अपिलें नामंजूर झालीं, १६८ अपिलांतील शिक्षा कायम राहिल्या. ३१ अपिलांतील शिक्षा कमी झाल्या. ९१ अपिलांतील ठराव फिरले. आणि एकांतील प्रोसिडिंग रद्द केलें. ज्युडिशियल कमिशनर साहेबांकडे अपिलें १२२ झालीं. त्यांतील ७४ अपिलें नामंजूर झालीं. ८ अपिलांतील शिक्षा कायम राहिल्या, १४ अपिलांतील शिक्षा कमी केल्या, १९ अपिलांतील ठराव फिरविले, व ९ अपिलांत हायकोर्टास अभिप्राय विचारिले.

ज्युडिशियल कमिशनर साहेबानीं ह्मटलें आहे कीं अपराधी लोक शिक्षेवर अपिलें विशेष करीतात असें दिसत नाहीं. कारण त्यांचे अपराध फार महत्वाचे नसतात व शिक्षा फार भारी नसतात ह्मणून माजिस्त्रेटाचे ठरावावर पुष्कळ लोक निमुटपणें राहून अपीलें करीत नाहींत.

एकंदर १२१२३ लोकांनां शिक्षा झाल्या. त्यांत २ फाशी गेले, १२२६नां सक्त मजुरी कैद झाली व यांपैकीं १०९ अपराध्यांनां एकांत कैद झाली. कांहीं जिल्ह्यांत एकांत कैदेच्या शिक्षेच्या कायद्याकडे न्यायाधिकारी विशेष लक्ष देत नाहींत असें ज्युडिशियल कमिशनर साहेबांस दिसून आलें आहे. इलिचपुर जिल्ह्यांत एकच मनुष्याला एकांत कैदेची शिक्षा झाली व वणी जिल्ह्यांत एकाही मनुष्याला झाली नाहीं. नुसत्या कैदेच्या शिक्षा २०५ मनुष्यांना झाल्या, व कैद झाल्या पैकीं शेकडा ३१ लोकांस दंड झाले. तसेंच कैदेच्या शिक्षा झाल्या पैकीं शेकडा ७७ मनुष्यास फटक्यांच्या शिक्षा झाल्या. फटक्याच्या शिक्षेचें मान जिल्ह्या जिल्ह्यांत वाढत आहे. बुलढाणें व इलिचपुर जिल्ह्यांत हलक्या चोऱ्याकरितां बऱ्याच लोकांस फटक्याचा शिक्षा दिल्या गेल्या. नुसत्या दंडाच्या शिक्षेचें मान सर्व जिल्ह्यांतून साल मजकुरीं कमी झालें आहे. उमरावती जिल्ह्यांत मागील सालापेक्षां शेकडा २१॥ या मानानें दंडाच्या शिक्षा कमी झाल्या आहेत. पण डिपुटी कमिशनरांनीं त्या विषयीं आपल्या रिपोर्टांत कांहीं लिहिलें नाहीं.

या सालांत दंड ८२१६१ रुपये झाला पैकीं ६२०३१ रुपये वसूल झाले. मागील सालचे दंडाची रकम १५६८९१ रुपये वसूल व्हावयाची होती. त्यापैकी ६७९१४ रुपये वसूल झाले. व १७१७८ रुपये न येतींत काढिले. दंडा पैकी ८१९९ रुपये फिर्यादीस दिले. मागील सालीं ही रकम ३५८१ होती.

चांगल्या वर्तणुकी बद्दल ५८ लोकांनां जामीन मागितले. त्यांपैकी २८ लोक जामिन न मिळाल्यामुळें कैदेंत राहिले. उमरावती जिल्ह्यांत चांगल्या वर्तणुकीसाठीं जामीन घेण्याकरिता पोलिसाने २१ लोक माजिस्त्रेटापुढें नेले. व माजिस्त्रेटांनीं ते सर्व सोडून देऊन पोलिसास टपका दिला कीं बदमाशपणाविषयीं चांगली खात्री करून घेतल्याशिवाय निरुपद्रवी व अनोळखी लोकांस असें संकटांत आणणें गैर आहे. ज्युडिशियल कमिशनर साहेब ह्मणतात कीं उमरावतीच्या या पैकी एका प्रकरणांत आमचें मत तेथील माजिस्त्रेटाच्या वेगळें होतें. माजिस्त्रेटानें सोडून दिलेले लोकांबद्दल कागदपत्र आह्मापुढें आले होते. आह्मी त्यांत मन घालणार तों ते लोक आपले देशास निघून गेले होते असें वाटतें व १८ व्या बाबेप्रमाणें त्याविषयीं तजवीज करणें योग्य होतें. असें आह्मांस वाटतें.

कामाच्या वहिवाटीसंबंधी या सालांत पुष्कळ सर्क्युलरें झालीं. माजिस्त्रेटांनीं सबार्डिनेट माजिस्त्रेटांचीं प्रोसिडिंग तपासून पाहण्यासाठीं मागवीत जाण्याच्या कामीं अधिक लक्ष्य ठेवावें असें ज्युडिशियल कमिशनर साहेब सुचवितात. व बुलढाणें जिल्ह्याच्या डिपुटी कमिशनरांनीं या बाबदींत कांहींच केलें नाहीं ह्मणून त्यानीं खेद प्रदर्शित केला आहे. ज्युडिशियल कमिशनर साहेबानीं अशा प्रकारची तपासणी बरीच केली व त्यांनां माजिस्त्रेटानीं सहाय दिलें याबद्दल त्यांचे त्यानीं आभार मानिले आहेत तसेंच यवतमाळचे डेपुटी कमिशनर मे. स्प्यान्स्की साहेब यांनीं आपले जिल्ह्यांत जी काळजीपूर्वक पाहणी केली व तिजविषयीं ज्युडिशियल कमिशनर साहेबांस सविस्तर लिहिलें त्याजबद्दल त्यांनीं त्यांचें विशेष वर्णन केलें आहे.

दिवाणी शाखा.

या सालांत दिवाणी दावे झाले ते:—

| | |
|---|---|
| मुख्य कोटांत | ३८ |
| जिल्हे कोटांत | १४१५१ |
| स्मालकाज कोटांत | ४१८९ |

———

१८१७८

गुदस्तसालीं दावे १६६५० झाले होते, वाशिम जिल्ह्यांत शेकडा ५३, उमरावती जिल्ह्यांत १७॥ व अकोल्या स्मालकाज कोटांत २० याप्रमाणे सालमजकुरीं दावे जास्त झाले आहेत. वाशिम जिल्ह्यांत जे दावे अधिक झाले त्याचें कारण असें आहे कीं गुदस्तसालीं तिकडे महामारीचा उपद्रव होता त्यामुळें दावे कमी होऊन या सालीं सुबत्ता असल्यामुळें लोकांनीं दावे केले. अकोल्यासही पिकापाण्याच्या आबादीमुळेंच दावे अधिक झाले आहेत खामगावचे स्मालकाज कोटांत शेकडा १५ प्रमाणे दावे कमी झाले व उमरावतीचे स्मालकाज कोटांत शेकडा ६॥ प्रमाणे कमी झाले. खामगावास कमी दावे होण्याचें कारण तेथील कोट कामाच्या दिवसांत तीन महिने बंद होतें हें आहे. उमरावतीचें कारण कांहीं लिहिण्यांत आलेलें नाहीं. अडगाव कोर्टाचें काम वऱ्हाडांतील इतर सर्व कोर्टांपेक्षां अधिक आहे त्यांनीं २४५८ दाव्यांचे फैसल केले. तेथील एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रा. केशवराव महिपत खारकर चांगले सशक्त नाहींत व त्यांनां तें काम फार अधिक आहे असें ज्युडिशियल कमिशनर साहेबांचें मत आहे.

एकंदर दाव्यांपैकीं १९६०३ दाव्यांचे या सालांत निकाल झाले त्यांची फोड अशी:

| | |
|---|---|
| दुतर्फा तक्रारी | ५५६५ |
| कबूल जबाबी | ६४८८ |
| गैर हजिरीनें काढिले | ८६६ |
| तोडजोडी होऊन | २८२५ |
| एकतर्फी | २१८२ |
| काढून घेतले | ३४९ |
| डिस्मिस केले | ८५ |

दुतर्फा तक्रारी दाव्याचें परिमाण शेकडा ३० आहे. मध्य प्रांतामध्यें सन १८७८ सालीं २८ होतें व पंजाबांत ३४ होतें. इलिचपुर जिल्ह्यांतील दुतर्फा दाव्याचें प्रमाण अधिक आहे ह्मणजे शेकडा ३६ आहे व बुलढाणे जिल्ह्याचें कमी आहे ह्मणजे शेकडा ९॥ आहे.

एकतर्फी दाव्याचें फैसल्यास सरासरी २६ दिवस लागले व दुतर्फीस ७१ लागले. मागील सालीं हें प्रमाण २२ व ६१ होते. उशिराचे परवावधि प्रमाण उमरावती २५९ दिवस, बुलढाणा १०६ व अकोला १०८ दिवस या प्रमाणें आहे

फिर्यादी करणारांमध्यें मारवाड्यांची संख्या विशेष आहे. त्यांच्या खालोखाल कुणबी. त्यांखाली ब्राह्मण व त्यांच्या खालचा नंबर मुसलमानांचा आहे

दुतर्फा दाव्याचे फैसल्यास जो सरासरींत १० दिवसांचा अधिक अवधि लागला त्याजबद्दल ज्युडिशियल कमिशनर साहेबांनीं लिहिलें आहे कीं सि. प्रो. १२८ कलमा प्रमाणे दस्तऐवज कबूल करण्याकरितां नोटिसा जातात त्यांचे जबाब येण्यास वेळ लागतो. व तसें होण्यास या प्रांतांतील रयत अज्ञान हेंच कारण आहे. हा मुलख शेतकरी लोकांचा व त्यांनां कांहीं कळत नाहीं. पण या कलमामुळे त्यापरी लोकांस फायदा झाला आहे. व हें कलम फार चांगलें आहे असें आमचें अनुभवास आलें आहे. मध्य प्रांतांत व मुंबई इलाख्यांतही या कलमावर विशेष भर असल्याचें दिसत नाहीं.

दावे झाले त्यांत पैशाच्या मागणीचे १५१२७ होते त्यांत दस्तऐवजावरून ९३९० व बिगर दस्तैवजाचे ५७१७ होते. करार मोडल्याचे दावे ५३५, भाड्याबद्दलचे १९९, जंगम मिळकतीबद्दल८९९, नुकसानीचे १६५, लग्नासंबंधी हक्काचे ५१, स्थावराचे १०४७, व इतर प्रकारचे ३५५ होते. या सालांत जे दावे झाले त्यांतील मागणीची एकंदर रकम १९११३६६ रुपये होती- गुदस्त सालीं हें मान २१५१५७४ रुपयांचें होतें. यावरून या सालांत दाव्यांचें मान वाढलें तरी रकमेचें मान कमी झालें असें दिसतें. ज्युडीशियल कमिशनर साहेब ह्मणतात कीं या सालांत लाख रुपयाचे व त्याच्या वरच्या रकमेचे दावे मुळींच झाले नाहीं

ते हें त्यास कारण आहे. तरी २० रुपये आणि १०० रुपये यांच्या मधील दाव्या च्या संख्येची या सालांत वाढ आहे, या दाव्यांनां २७९०८१ रुपये खर्च आला. गुदस्त सालीं २१०५०२ रुपये आला होता.

न्यायाधिशाकडून दाव्यांचे निकाल झाले तेः-

| | |
|---|---|
| डिपुटी कमिशनर | १० |
| असिस्टंट कमिशनर | १४६७ |
| एकस्ट्रा असि॰ कमिशनर | ७६७१ |
| मक्याची | १२९३ |
| तहशिल्दार | ३६८१ |

डिपुटी कमिशनरांनीं साऱ्या सालांत जे ३० दाव्यांचे निकाल केले त्यांची फोड अशी आहेः—

| | |
|---|---|
| इलिचपुर डिपुटी | १५ |
| अकोला ,, | १० |
| उमरावती ,, | ४ |
| बुल्ढाणा | १ |

तहशिलदारांनीं किती किती काम केलें याचें टिपणः — दर्यापुर ७४०, मंगरूळ ४६८, पुसद ४४२, उमरावती ३८७, दारव्हा ३३६, यवतमाळ ३१७ वणी २७०, व वाशीम २४४.

कोर्ट फी व प्रोसेस फी यांचें उत्पन्न या सालांत २८२७१० रुपयांचें झालें. व प्रोसेस खर्च ५१४६५ रुपये होऊनें २३१२४५ रुपये बचत राहिली. हें उत्पन्न गुदस्त पेक्षां २६००० रुपयांनीं वाढलें आहे.

साक्षीदार न्याय कोर्टापुढें ३२२२३ आले होते व त्यांतून २०६११च्या साक्षी झाल्या.

स्माल काज कोर्टें वऱ्हाडांत ३ आहेत. अकोलीं, खामगाव, उमरावती तिन्ही कोटांत मिळून दावे ४१८९ झाले. अकोले कोटांत १ दावे च्यार महिन्यांहून अधिक काल पावेतो राहिले होते त्याचें कारण स्माल काज जडजांनीं लिहिलें आहे कीं या फिर्यादी ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे कंपनीवर होत्या व साक्षीदारांच्या साक्षी बेलारीकडून यावयाच्या होत्या त्यांस उशीर झाल्यामुळें अवधींचें मान वाढलें. उमरावती स्माल काज कोटांत रोख्यावरून दावे कमी झाले व खात्यावरून अधिक झाले त्याचें कारण जडजांनीं लिहिलें आहे कीं कुणबी लोक मारवाड्यास नवा रोखा लिहून न देतां त्याचे वहीवर बाकी रुजू करून देतात. त्यांस रोख्याची भानगड वाटते व मारवाड्यास वहीवर रुजुवात होते हें अधिक बळकटीचें वाटतें त्यामुळें रोख्याचा प्रघात कमी होऊन खाते रुजुवात वाढत चालली आहे.

स्माल काज कोटांत दाव्यांच्या मागणीची रकम ३२८५९३ रुपये होती, गुदस्त सालीं तीन लक्ष. प्रत्येक दाव्यास सरासरी खर्च १०८५ लागला. मागील सालीं ९८८ लागला होता स्माल काज कोर्टांनां कोर्ट फी वगैरेचें उत्पन्न ४८९४२ रुपये झालें व खर्च ४५५२८ रुपये झाला. याची फोड अशीः—

| | जमा | खर्च |
|---|---|---|
| उमरावती | २०५५२ | १७६३३ |
| खामगाव | १०७८० | १२४३१ |
| अकोला | १६९०८ | १५४६२ |

स्माल काज कोर्टें काढून त्यांची दुसऱ्या प्रकारें कांहीं व्यवस्था करावी ह्मणजे जुडिशियल खात्याची चांगली सुधारणा होईल व त्या विषयीं जु॰ क॰ साहेबांनीं एक योजना करून पूर्वींच रेसिडेंट साहेबाकडे पाठविली आहे ती लवकर मंजूर होऊन आली ह्मणजे चांगलें होईल असें त्यांनीं रिपोर्टांत लिहिलें आहे.

या सालांत डिपुटी कमिशनर साहेबाकडे अपिलें ३४७ झालीं त्यांत अवल ठराव कायम राहिले शेंकडा ५३॥. रकमा कमी केल्या तीं शेंकडा ९।. ठराव फिरविले तीं शेकडा २१, परत चौकशीस पाठविलीं तीं शेकडा १२॥ व गैरहजरीमुळें काढून टाकिलीं तीं शेकडा ३॥ याप्रमाणें आहेत.

उमरावती डिपुटी कमिशनरांनीं अपील काम विशेष केलें नाहीं व मुलकी कामाचें आपणावर अधिक ओझें असल्यामुळें तें काम आपणाकडून अधिक झालें नाहीं असें त्यांनीं ह्मटलें आहे. त्यावर जुडिशियल कमिशनर साहेबांनीं रिमार्क केली आहे कीं ही सबब कबूल करण्याजोगी नाहीं यांच्याकडे अपीलीचें काम फार होतें असें नाहीं. २२९ अपिलें ह्मणजे महिन्यास २० देखील नाहींत. तशांत दिवाणी अवल कामही यांकडे फार कमी होतें ह्मणजे एकंदर ९ मुकदमे व त्यांतून ३ शिलकच आहेत.

बुलढाण्याचे डेपुटी कमिशनर सबार्डिनेट जडजांचीं प्रोसिडिंगें आणवून तपासित नाहींत व त्याजबद्दल जुडिशियल कमिशनर साहेबांनीं त्यांस विचारिलें होतें पण त्यांनीं समाधानकारक असा कांहीं जबाब दिला नाहीं ह्मणून रिपोर्टांत गिल्ला आहे. व यवतमाळचे डिपुटी कमिशनरांचा खालच्या कोटांच्या कामावर चांगली पैरवी नाहीं असें जुडिशियल कमिशनर साहेबासच दिसून आलें आहे.

जुडिशियल कमिशनर साहेबाकडे अपिलें ३२९ झालीं व त्यांतून ४,२७७ चे निकाल झाले. गैर हजरीमुळें काढिलीं १३२ मूळ ठराव कायम केले ८०, रकमा कमी केल्या अशीं १४, ठराव फिरविले अशीं ३८ व परत चौकशीस पाठविलीं १३

वकील ९३ आहेत. पैकीं अकोले जिल्ह्यांत ३७, उमरावतीस २४, बुलढाण्यास १२, इलिचपुरास १२, वाशिमास ५ व यवतमाळास ३ आहेत. मुंबई हायकोर्टाच्या परीक्षेचे कित्येक वकील हल्लीं वऱ्हाडांत आलेले आहेत. व वऱ्हाडांत आपण येऊन राहतो असें त्यांनीं कबूल केल्यावरून रेसिडेंट साहेबांनीं त्यांनां इकडे कामें करण्यास परवानगी दिली आहे.

लीगल प्राक्टिशनरचा ह्मणजे वकील लोकां विषयींचा नवीन झालेला कायदा वऱ्हाडांत लवकरच लागु करण्याविषयीं सूचना करण्याचा आपला हेतु जुडिशियल कमिशनर साहेबांनीं या रिपोर्टांत रेसिडेंट साहेबास कळविला आहे.

सि. प्रो. कलम ५१ मध्यें बदल झाला व फिर्याद अर्जी खालीं अर्जदारानें सही करण्याची जरूरियात उत्पन्न झाली ही मोठी सुधारणा झाली व या प्रतालाला ती होणें फार अवश्य होतें व याविषयीं मागें आह्मी लिहिलें होतें असें जुडिशियल कमिशनर साहेब ह्मणतात. अकोल्याच्या स्मालकाज जडजाच्याही या बाबदींतील लेखाचें दिग्दर्शन जु॰ क॰ साहेबानीं केलें आहे.

समन्साला प्रतिवादी भेटला नाहीं तर त्याला लागलीच वारंट करावें ही वहिवाट इकडे फार होती व तिजवर गुदस्त सालचे रिपोर्टांत रेसिडेंट साहेबानीं टीका केली होती व त्याविषयीं जुडिशियल कमिशनर साहेबानींही सर्व न्यायाधिशांस लिहिलें होतें, तरी कांहीं कोर्टातून या सालीं बरींच वारंटें झालीं आहेत व त्याजबद्दल डेपुटी कमिशनरांनीं आपल्या रिपोर्टांतून कांहींच उल्लेख केला नाहीं.

डिपुटी कामिशनरांनीं खालील कोटांचीं प्रोसिडिंगें आणवून तपासिलीं त्यांचें टिपण असेः—

| | मुकद्दमे | बरोबर | चुकीचे |
|---|---|---|---|
| अकोला | ४७ | ४१ | ४ |
| बुलढाणें | ० | ० | ० |
| वाशिम | १३ | ९ | ४ |
| उमरावती | १०३ | १९ | २८ |
| इलिचपुर | २४० | ८४ | १५६ |
| वणी | ९८ | ५१ | ४५ |

रिपोर्टांत बुलढाण्याचें या कामीं पूज्य आहे. पण जुडिशियल कमिशनर साहेब आपले रिपोर्टांत या कलमा खालीं टीप देऊन लिहितात कीं त्यांनीं १७६ दिवाणी मुकद्दम्यांचीं प्रोसिडिंगें आणवून तपासलीं असें मागून त्यांजकडून पत्र आल्यावरून समजलें पण त्यांचें दुर्लक्षानें रिपोर्टांत त्याविषयीं कांहींच लिहून आलें नाहीं.

विशेष कारण नसतां जागच्याजागीं चौकशीचीं कमिशनें न्यायाधिशांनीं दिलीं त्यांचे मनाईविषयीं जु॰ क॰ साहेबांस त्यांनां लिहावें लागलें. व एका न्यायाधिशानीं कमिशन दिलेल्या लाकांवर अयोग्य प्रकारचा हुकूम चालविला असेंही एक प्रकरण जुडिशियल कमिशनर साबेबांपुढें आहे व त्याचा निकाल होणें आहे असें त्यांणीं रिपोर्टांत लिहिलें आहे.

उमरावतीचे डिपुटी कमिशनरानीं आपले असिस्टंटपैकीं कांहीं वयानें लहान व कमी अनुभवाचे असल्याविषयीं गाऱ्हाणें केलें आहे. पण तें जुडिशियल कमिशनर साहेबास सुयुक्त दिसलें नाहीं. त्यांनीं रिपोर्टांत लिहिलें आहे कीं संख्येच्या मानानें अकोल्यास जितके आहेत तितकेच पुष्कळ असिस्टंट उमरावतीस दिलेले आहे. शिवाय त्यांच्या तेथील स्मालकाज कोटाला युरोपियन न्यायाधीश आहेत त्यामुळें अपीलसंबंधी काम त्यांनां कमी आहे. शिवाय रा. रा. श्रीकृष्ण नरहर त्यांच्या हाताखालीं आहेत हे जरी नेटिव आहेत तरी उत्तम काम करणार, पुष्कळ अनुभवाचे, हुशार आणि पुष्कळ वर्षे नावाजलेले आहेत. त्यामुळें डिपुटी कमिशनरांचें तें ह्मणणें जमेस धरण्याजोगें नाहीं.

कित्येक डिपुटी कमिशनरांनीं आपले हाताखालील अधिकाऱ्यांची तारीफ केली आहे व तिला जुडिशियल कमिशनर साहेबांनीं आपलें अनुमत दिलें आहे. ते गृहस्थ असेः—मे॰ थामसन साहेब, मि॰ इलियट साहेब, मि॰ हेर साहेब, रा॰ रा॰ श्रीकृष्ण नरहर, रा॰ रा॰ आत्माराम भिकाजी, रा॰ रा. पुरुषोत्तमराव नारायण, व रा॰ रा॰ बापुजी रंगनाथ. याचप्रमाणें कित्येक तहशिलदारांचीं नावें आहेत तींः—रा॰ रा॰ गोविंदराज अप्पा, रा. रा. गोविंदराव यशवंतराव, रा. रा. सदाशिव भास्कर, मि॰ सादत मीर खान, रा. रा. त्रिंबकराव यशवंतराव, रा रा. हणमंतराव रामचंद्र, रा. रा. अंबादास संतो, मि॰ अबदुल अजीज, मि॰ मुबारकअली, मि: शाबासखान, व मि. एदलजी जमशेटजी

शेवटीं जुडिशियल कमिशनर साहेबानीं आपले आफिसांतील मि. जोन्स साहेब रा. रा. भास्करराव, रा. रा. वासुदेव सदाशिव, व मि. महमम इस्मायल यांची तारीफ करून रिपोर्ट संपविला आहे. आतां यावरील रेसिडेंट साहेबांचा अभिप्राय व आमचें मत पुढील खेपेस लिहू. आज हें प्रकरण फार वाढलें.

## वऱ्हाड

यांही आठवड्यांत पर्जन्यानें चांगली कृपा केली. आरंभीं अर्धा आठवडा नित्य पाऊस पडला. व आलिकडे चांगली उघाडी व उन्हाच्या तापी पडत आहेत. असेंच पुढें चालल्यास पिकें चांगलीं येतील. नदीला मोठमोठाले या आठवड्यांत तीनदां पूर आले.

---

एथील हुजूर नाझर रा. रा. [illegible] देशमुख यांचे कडील पेटींतून ३३० रुपये चोरीस गेलेले त्यांनीं भरावे असा हुकुम आला व त्याप्रमाणें ते त्यांनीं भरले. आमचे एकण्यांत आलें आहे कीं रामरावजी या कारणानें नाउमेद झाले आहेत. व ते रजा घेण्याचे विचारांत आहेत. पण असें त्यांनीं करूं नये. काम व प्रसंग मनुष्यास शहाणे करितात. यावरून त्यांनीं उमेद राखून अधिक खबरदारीनें व हुषारीनें. काम करावें व सरकारचें जें कृपादान त्यांनां मिळालें आहे त्याचें चांगलें चीज करावें. या त्यांच्या डरण्यानें दुसरे लोक वचकूं लागतील व तेणेकरून सरकारी अधिकाऱ्यांचा हेतु सिद्धीस जाणार नाहीं.

---

स्यानिटरी कमिशनर साहेबांचें आफिस अकोल्यास आहे तें उमरावतीस जाण्याचा ठराव खास झाला व लवकरच तें तिकडे जाईल असें आमचे बंधू उर्दूअकबार कर्ते यांस चांगल्या आधारावरून समजलें आहे. सर्व आफिसें उमरावतीस किंवा अकोल्यास असावीं याविषयीं मागें पुष्कळ वाटाघाट होऊन तेथलीं तेथें व एथलीं एथें रहावीं असा निकाल होऊन ती गोष्ट थंडी झाली होती परंतु तिनें पुन्हा उचल घेतली व उमरावतीकडे सरकारचा कल झाला कीं काय? तें कळत नाहीं. एवढेंच हें एक खातें तिकडे नेल्यास विशेष नाहीं पण जुडिशियल कमिशनर साहेबाचें व डायरेक्टर साहेबाचें आसासहीं याप्रमाणें चरनक्षत्र लागल्यास अकोल्याची स्थिति अवघड आहे या बाबदींत अधिक विश्वसनीय कांहीं कळेपर्यंत आह्मी अधिक लिहीत नाहीं.

---

म्याट्रिक्युलेशन परीक्षेस येथून ७ व उमरावतीहून ७ विद्यार्थी जाणार आहेत.

---

बुलढाण्याच्या सिव्हिल आस्पिटलावर मि. शेखअबदुल करीम यांस नेमिलें.

## वतमानसमाचार

प्रायाश्चित्त घेण्याचा विचार— श्री॰ बापू साहेब कुरुंदवाडकर यांचे पदरीं एक परभू जातीचा मनुष्य आपण ब्राह्मण आहे असें ह्म

तीन महिने पर्यंत नौकरीवर होता. पुढें तो मनुष्य स्वयपाकाच्या कामांत चांगला कुशल असें समजल्यावरून त्यास श्रीमंतांनीं आपल्या मुतपाकाकडे नेमिला. तो अजमासें सात महिने पर्यंत श्रीमंतास व बरोबरच्या सर्व मंडळींस उत्तम पवित्र अन्न घालीत असे. ऐके दिवशीं त्या इसमाचे गांवचा सोनार श्री० चे वाड्यांत भोजनास गेला होता. त्यावेळीं सदर इसम वाढणेंकरितां बाहेर आला तेव्हां सदर सोनारानें त्याच्या हातचें अन्न घेतलें नाहीं. आणि तसाच उठून श्रीमंताचे कानावर जाईल असें ओरडून ह्मणूं लागला कीं, हा गृहस्थ परभू असून याचे हातचें अन्न तुह्मी ब्राह्मण लोक कसे खाता! इतके ऐकतांच सदर परभूनें एकदम पळ काढला परंतु त्यास पकडून त्याजवर श्रीमंतांनीं खटला सुरू केला आणि दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा दिल्याचें ऐकतों, आतां श्रीमंता सह कुरुंदवाडकर लोक प्रायश्चित घेण्याचे विचारांत आहेत.

रशिया देशांत एकंदर ८९,००० ख्रिस्ती देवाल्यें असून त्यांस रशिया सरकारांतून सुमारें ७८ लक्ष रुपये वेतन आहे. मुख्य पुजारी ३७,७१८ आहेत व गुमास्ते ११,८९७ आहेत ६२,९९१ चाकर लोक आहेत. यावरून देवालयाकडे खर्च करण्याची रीत आमच्याकडेच आहे असें नाहीं.

बिलायतेस एका गृहस्थास एक मुलगी असून ती नेहमीं झोंपेंत असते. तिचें खाणें पिणेंहि झोंपेंतच होते! कदाचित जागी झाल्यास तास अर्धा तास जागी असते व तेवढ्या वेळांत ती चांगल्या हुषारीनें काम करतें. ती आत्या स्वरूपवान असून तिचा बापही खातीपिता आहे हा त्या बाईचा अवगुण जण्याकरितां तिचा बाप पुष्कळ खटपट करीत आहे, पण ती सर्व व्यर्थ! पु. वै.

रशियन लोकांवर मध्य एशियामध्यें तुर्कोमान स्वार लोकांनीं हडजा कलशी व बोनेहसन येथें हल्ला केला आणि रशियन लोकांचीं पुष्कळ हत्यारें व सामानें नेलें.

डांकेस हरकत.—ता. ३ सप्तंबर रोजीं नांदगाव आणि औरंगाबाद येथील डांक घेऊन जाणाऱ्या तांग्यांची औरंगाबादेपासून ९ मैलांवर गांठ पडली तेव्हां नांदगांवच्या तांग्यांत निजाम सरकारचे पोलीस कमिशनर क्याप्टन अहमद व त्यांचा एक स्नेही असे हैदराबादेस जाण्या साठीं बसले होते. त्यांनीं औरंगाबादच्या हिंदु तांगेवाल्यास तांग्याची अदलाबदल करण्यास सांगितलें. त्यानें ती गोष्ट नाकारली ह्मणून त्यांनीं त्याची गाडी थांबवून त्यास डोक्यावर तोंडावर व पाठीवर जखमा पडत तों मारिलें. कपाळावर एक जखम १॥ इंच खोल पडली आहे. डांक औरंगाबादेस पोंचल्यावर डांकेच्या मक्तेवाल्यांनीं तें प्रकरण मुख्य अंमलदाराकडे पाठऊन दिलें. हें प्रकरण बरेंच माजेलसें वाटतें

कंदाहारांत अस्वस्थता.— गांवांत गाजी लोकांच्या गडबडीच्या संशयावरून नीट बंदोबस्तानें असण्याविषयीं फौजेच्या लोकांस हुकूम झाला आहे. शिपाई व त्यांजबरोबरचे लोक यांणीं एक्या नेमलेल्या दरवाज्यानेंच आंत जावें आणि टोळ्या टोळ्यांनीं असावें. टोळींत पांचांपेक्षां कमी असूं नयेत. गांवांत शिरतांना बेनेटें बंदुकीवर बसवावीं आणि कोणीं हल्ला केल्यास गोळी न घालतां बेनें टांचाच उपयोग करावा. याप्रमाणें हुकूम झाल्याचें तारीख १० च्या तारेवरून समजतें

जनरल राबर्ट्स यांनीं जाहिरनामा प्रसिद्ध करून आपल्या सैन्याचे आभार मानले आहेत आणि ज्या ज्या वेळेस लढाईवर जाण्याचें काम पडेल त्यां त्या वेळीं हल्लींचें काबूल कंदाहार सैन्य जर मजपाशीं असेल तर मी आपणास मोठा भाग्यवान मानीन असें त्यांत ह्मटलें आहे.

कलजा प्रांताच्या संबंधानें चीन व रशिया सरकारामध्यें जो लढा पडला आहे त्याचा निकाल नीट रीतीनें होत असून त्या संबंधाच्या तहावर पेकिन एथें उभय राष्ट्राच्या सह्या होणार आहेत.

विलायतेंत सीहम एथें एक कोळशाची खाण पेटून तींत काम करीत असलेले सुमारें १९० लोक मेले.

पार्लमेंट तारीख ७ सप्टंबर रोजीं तहकूब झालें. त्या वेळेस लार्ड चान्सलर यांनीं राणी सा.चें भाषण वाचून दाखविलें त्यांतील मुख्य मुद्दे— तुर्कस्थानच्या बादशहानीं आपले करार पुरे केले नाहींत ह्मणून मांटेनिग्रोच्या सरहद्दीचा निकाल लांबणीवर पडला. तसेंच बर्लिनच्या तहांतील दुसरे कित्येक महत्वाचे मुद्दे अमलांत न आल्यामुळें त्याविषयींचे आपलें ह्मणणें प्रमुख राष्ट्रांनीं तुर्कस्थानच्या बादशहास कळविलें. आणि त्यांनीं आपल्या राज्यांत शांतता राहील अशा उपायांची योजना करण्याविषयीं बर्लिनच्या तहावर सह्या करणाऱ्या राष्ट्रांनीं तुर्कस्थानच्या बादशहास फार आग्रहानें कळविलें. लिबरलपक्षाची कारकीर्द सुरू होतांच अफगाणिस्थानांतील लढाई बंद करण्याचा विचार होऊन तो अमलांत येणार इतक्यांत अयूबखानाचा मोठा अडथळा आला तथापि जनरल राबर्टस यांनीं त्याचा पराभव केल्यामुळें आतां इंग्लिशांची अब्रु कायम राहून सैन्य जलदीनें परत येईल. यां लढाईच्या खर्चाच्या हिशोबासंबंधी घोटाळ्याविषयीं दुःख प्रदर्शित करण्यांत येऊन या खर्चाचा बराच मोठा भाग इंग्लंड देईल असें सांगितलें.

काश्मीरची राजधानी श्रीनगर एथें तारीख २ सप्टंबर रोजीं संध्याकाळीं आगीनें दोडशांवर घरें जळालीं.

काश्मीरच्या महाराजांनीं फ्रान्स देशांतील द्राक्षांची आपल्या देशांत कशी काय लागवड होते तें पहाण्यासाठीं एका फ्रेंच मनुष्यास त्या कामावर ठेवून तसल्या द्राक्षांची लागवड करविली. त्यांचें पहिलें पीक येऊन त्या द्राक्षांचा रस काढून मोठमोठाल्या गोऱ्या अधिकाऱ्यांस आमंत्रण करून त्यांस ती पाजिली. मंडळी खुष होऊन तिनें राणी सरकारची याद करून त्यांच्या आरोग्यार्थही पान केलें. ने० ओ०

---

## इंदापुरची भयंकर स्थिति

आपले पासून सिंह गेल्यावर पुनः त्याचें मागें अवलोकन झालें ह्मणजे फार भीति वाटते. बरा झालेला आजार एकदा उलटला ह्मणजे तो दुःसाध्य असें बहुधा अंशतःतरी स्वानुभवी आहेच. तद्वत नवीनच गेलेल्या दुष्काळाचें सिंहावलोकन हल्लीं झालें आहे यामुळे तूर्त लोक फार हवालदील आहेत. पहिले डाग बरे झाले नाहींत तोंच पुनश्च त्यावर भयंकर डागण्या बसणें किती दुःसह आहे हें सांगणें नको. त्यांतून दुष्काळाचा मूळ उद्भव काय तो आमच्या भाग्यवान इंदापुरापासूनच ह्मटला तरी चालेल व हें त्याचें माहेर नजर बनल्यामुळें दुष्काळाची मोठी मेहर जनर जशी इंदापुरावर आहे तशी इतरत्र नाहीं असें एकंदरीच्या अनुभवावरून उघड दिसेल. कोठें असेल तरी आमच्या संगतीचाच गुण होय असें आह्मी खचित समजतों. आपलेकडे पर्जन्य भरपूर असून लोक आनंदांत आहेत इतकेंच नाहीं पण एथून ३ कोसांवर भिमा नदीच्या पलीकडे देखील थोडा कां असेना पण पर्जन्य आहेच, परंतु अगदीं रेघ ओढून दिल्याप्रमाणें हा एवढा आमचाच भाग पर्जन्यानें सवतीचे मुलासारखा कां गाळला हें कळत नाहीं. मुळापासून आजपर्यंत पर्जन्य बिलकूल नाहीं. खरीप तर नाहींच पण रबीचे पेरे सुद्धां होतां दिसत नाहींत. यामुळें ७८ सालच्या दुष्काळापेक्षां हा प्रसंग फारच दुर्धर संकटाचा वाटतो व रात्रंदिवस षडक्षरी मंत्राची घोकणी चालू आहे. पर्जन्यवृष्टी व्हावी ह्मणून शोदून ताणून कसा तरी श्री महादेवास एकदम सात दिवस संतत धारेनें अभिषेक करून त्याची सांगताही उत्तम केली परंतु गुण नाहीं. कसबयांत व पेठेंत ७ दिवस हरिनामाचे भजनरूप २ सप्ताह झाले व त्याचे मागें सांगताही झाली. अभिषेक व नामाचे सप्ताह यांची सांगता केवळ उत्तर कार्य रूपाचीच झटली तरी क्षणभर चालेल. ज्याचें फळ अदृष्ट तें कर्म आपले विचारबाह्य आहे. असो. "गतानुगतिका लोकः" हेंच खरें. तात्पर्य "पर्जन्य नाहीं." रात्रंदिवस वारा मात्र खूप सोसाट्यानें वाहतो. यामुळें जरा कांहीं जमलेलें मेघमंडळ लागलीच इतस्ततः होतें. वारा वाहणें बंद झाल्याविना पर्जन्य पडेल असें वाटत नाहीं. महामारी या नांवानें होणारा वाऱ्याचा उपद्रव यापुढें कांहींच नाहीं. कारण, तो ज्यास लागू होईल तोच मरणार व त्या तडाक्यांतून ही कित्येक उपायानें पार पडतात; पण हा वाऱ्याचा उपद्रव एकदम सर्वांसच लागू होऊन त्याचे परिहारार्थ उपायच सुचत नाहीं. या योगें एकंदरीचा विनाश होण्याचा समय तर येऊन पोहचला आहे. पत्रकर्ते महाराज तुमचेकडे कायतो एक वर्षाऋतूच आहे; पण आमच्या या भागांत एक समयास सहाही ऋतु सारखे भासत आहेत.

१ जनावरांस चाऱ्या ऐवजीं पिंपळाच्या वगैरे पाल्याचा उपयोग चालू असल्यामुळें ते वृक्ष अगदीं अपल्लवी दिसतांत हा वसंतऋतु- २ सूर्याचा प्रखर ताप व दोन प्रहरीं अंगांतून घामाचे लोट चालून विंजण्याचा उपयोग करीत असतो हा ग्रीष्मऋतु. ३ पुढें परिणाम काय होईल या धास्तीनें व क्षुधेनें गरीब लोकांच्या नेत्रांतून सतत उदकवृष्टि होते हा वर्षाऋतु. ४ रात्रीं मजेदार स्वच्छ आकाशांतून नक्षत्रें चमकतात व सुरेख चटकदार उत्तम चांदणें पडतें हा शरदृतु. ५ मध्य रात्रीचे पुढें छांदार गुलाबी थंडी पडते हा हेमंत ऋतु. ६ रस्त्यानें धूळ उडते व एकाच वेळेस वसंतादि ५ ऋतु असल्यावरून प्रायः घरोघर शिमगाच हा शिशिरर्तु.

यावरूनच येथून आमची दशा काय होणार याचें अनुमान तुम्हींच करा. गावांतील आड एकामागुन एक ( मोठ्या वीरश्रीनेंच कीं काय ) आरोळ्या देत सुटले आहेत, बागाइताच्या विहिरी आठ चार दिवसांत दाणे साठविण्याच्या पेवाचें अनुकरण करणार आहेत व कांहींकांनीं तर केलें ही आहे. यास्तव बागाइतांत उत्पन्न तर असो: पण पिण्यापुरतें तरी पाणी कसें मिळेल ही आतांच धास्ती पडली आहे. तलावाकडे पाहिल्यास म्युनिसिपालिटीच्या उपकारानें तिकडे अखेरच्या वेळेशिवाय जाण्याचें कारणच पडत नाहीं. असें कां? तर मुळींच तळें कोरडें ठणठणीत. वाटसरू लोकांस पाणी मिळण्याची मारामारच. येथील लोकांचीं जनावरें पाण्यासाठीं येथून ३ कोसांवर भिमा नदीस न्यावीं लागतात. केवळ पाण्याकरितांच दररोज जनावरांस ३ कोसांचा हेलपाटा बसतो यावरून त्यांस दुसऱ्यानें पाणी मिळतें कीं नाहीं हें सांगणें नकोच सारांश एकंदरींत अन्नपाण्यावांचून मरण्याची पाळी आहे. मागील दुष्काळांत बाहेरून उदार गृहस्थांकडून आमचे इंदापुरास उत्तम मदत मिळाली होती ह्मणून कांहीं तरी तरणोपाय लागला. पण आतां वरचेवर तेंच तें असल्यामुळें ह्मणा किंवा गरिबांचे दुर्दैवामुळें ह्मणा अगर अनिर्वचनीय अशा आमच्या वर्तणुकीवरून ह्मणा कांहीं तरणोपाय लागेल अशी आशा करवत नाहीं. भिकार व अन्नावांचून बुभुक्षित लोकांचे देखावे दृष्टीस पडूं लागले आहेत. हर हर परमेश्वरा. किती अंत पाहशील ! अद्यापि आमच्या गुन्ह्याचें शासन तुझ्या मनाजोगें झालें नाहीं काय? हे दयाघना, तुह्मास मनुष्यांची तर दया येतच नाहीं; पण मुक्या व तुह्मांच पवित्र मानलेल्या गाईची सुद्धां अजून दया येत नाहीं काय! आह्मीं आपली नीति सोडली व तुला विसरलों ह्मणून कदाचित तूं आह्मांस शासन करीत असशील; पण देवा, जनावरांनीं तुझा असा कोणता अपराध केला ह्मणून त्यांस तूं नुसतें पोटभर पाणी सुद्धा मिळूं देईनास! हे विश्वंभरा आह्मांवर वरचेवर असा भयंकर प्रसंग आणणें तुझ्या नांवास तरी योग्य आहे काय? हे शेषशायिन् अद्यापि आह्मांविषयींची तुझी झोंप संपली नाहीं काय? हे सर्वज्ञा, आमची हवाल तुला दिसत नाहीं काय? हे अनंता, दुष्काळ कृतांतानें आमच्या गळ्यावर सुरी ठेविली आहे कीं रे? हे कृष्णघना आमचे प्रेमचातक रात्रंदिवस तुझ्याकडे आहेत बरें? आपल्या उदयानें आमच्या संतप्त मनोमयूरांस आनंदित करशील काय? हे लीलानाटका, विनोदानें परीक्षा पाहण्याची ही वेळ नव्हे. खचितच आमचा प्राणपंचकानें जाण्याच्या तयारीस लागून प्रस्थान ठेविलें आहे! ह्मणून हे देवा, हे जगत्पालका, आतां तुजवांचून कोणी त्राता नाहीं हें पक्के समजून धाव; लौकर धाव; आळस करूं नको. येरे सख्या लौकर धाव. हीच ईश्वराची प्रार्थना करणें आपलें कर्तव्य आहे. इतःपर "हरेरिच्छा बलीयसि.", क. त. न्हे

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

## THE LOCAL BAR.

Sir William Draper in reply to a letter of Junius says "Disappointed ambition, resentment for defeated hopes, and desire of revenge, assume but too often the appearance of public spirit: but be his designs wicked or charitable, Junius should learn, that it is possible to condemn measures, without a barbarous and criminal outrage against men." Such evidently is the case with the Editor of our contemporary the "Urdu Akbar" the Junius Redivious.

In the last issue of the Akbar under the Head of "Berar Bar" our young contemporary writes an essay of a school boy, who commences his exercises in English Composition, and as to his Logic, even the very hair of Mr. Mill would stand erect, had that great Logician lived to read the major and minor premises of this youth.

Our contemporary congratulates himself on his "success in drawing the attention of our Resident, who has always the good and welfare of the people of Berar in the inmost recesses of his heart" to the columns in his "late issues on the subject."

We are in a position to affirm, that the generality of our newspaper readers, can ill afford to devote their time, even to glance at a mere trash, and unimportant matter, much less the Resident, who cannot allow a moment to be wasted on the perusal of useless publications, unless it be to gratify curiosity, during his spare moments.

The proposal of submitting the present set of Pleaders to an examination is said to have emanated from the Judicial Commissioner, who is now engaged, in considering the *Pros* and *Cons* of the subject.

To verify our statement of the position of our contemporary he says "the news of the examination, is welcomed by the well educated youths of this day in Berar, with transports of joy and which is quite in harmony with our own feelings." If he is content with styling Oomadvars and self-sufficient clerks and Karkoons as "well educated youths," and put himself on a level with them, we confess, we only echo the voice of the public, at the deep regret, which this sad state of affairs creates in our mind.

The pleaders in this Province have been once, pronounced to be duly qualified to practise in the local Courts, and are not required to possess any knowledge of English.

We cannot admit the argument that, because, the major portion of them are unacquainted with English, therefore they are incompetent to practise, for this is simply a *Reductio ad absurdum.* All the acts are translated into the vernaculars, and the Pleaders daily conduct their cases, by the aid of the Vernacular Publications, and this is the case even with the Law Reports.

We have at times heard of the dissatisfaction expressed by the Judicial Commissioner and other officers, with regard to some of the Pleaders appearing in Courts without knowing any thing of their case. This is an evil the growth of which must be checked, and the Judicial Commissioner has the power with the sanction of the Resident, of cancelling the Sannad of any Pleader for such gross neglect of duty.

Another and more simple plan would be to classify the pleaders according to their ability and knowledge, in the same way as the Resident has done for his Court.

Our young contemporary betrays his gross ignorance, of the provisions of the Legal Practitioners, act when he says "according to this Bill (?) all existing, and former certificates, sannads &c. of Pleaders, other than those who have passed the High Court pleader's examination of the three Presidencies will be deemed to be cancelled." For section 2 of the act is very clear and contemplates no such retrospective effect and if such was the intention of the Legislature, the subject could not have escaped the notice of the Law Member of the Supreme Council. The second para of the section runs thus "All Rules, and appointments made, penalties prescribed, fees fixed, persons admitted, names enrolled, certificates issued, sanctions given, and orders passed under any enactment hereby repealed, shall be deemed to be respectively made, prescribed, fixed, admitted, enrolled, issued, given, and passed under this act."

When the late supreme and Sudder Courts were amalgamated the privileges accorded to the old pleaders, were left undisturbed, and as far as we know, there has been no precident to the course that we hear of being inaugurated. In Bengal, Central Provinces, Punjab, and other parts of the country, the provisions of the act have not been considered to have any retrospective effect, and if the Act is at all extended to this Province, we see no reason for a departure from its express provisions.

If it is the object of Government to secure English speaking pleaders, it will be fully gained by restricting the new comers to an Examination in English and the old pleaders will, as a matter of course, gradually retire from business.

In all Moffussil Courts, throughout the country, the majority of Pleaders, are totally unacquainted with the English language, and they are not and could not with any propriety be subjected to any examination after they have been once declared, qualified to hold a Diploma. If this system is adopted, every Legal Practitioner, from the Queen's Counsel down to a Mooktear, will have to undergo an examination from time to time.

We do not wish to go deep into the subject as we are sure that the introduction of such an unprecedented act, is, and has always been very far from the mind of the Resident and the Commissioners.

Even our contemporary, with all his imaginary congratulations and whimsical arguments, regarding the subjection of pleaders to an Examination is compelled to express a wish "to protest lately for the urgency and necessity of the introduction of this Bill, and the pleader's Examination."

In conclusion we hope that the authorities will not treat unjustly a class of respectable men who have spent the best portion of their lives in pursuing this honorable profession and secured, by discharging faithfully their duties to their clients, the confidence and sympathies of the people of Berar.

## वऱ्हाड.

रा. रा. रामराव व्यंकटेश अडगाव कोर्टाचे शिरस्तेदार यांस पेनशनाकरितां डाक्टरचें सार्टीफिकेट मिळालें.

जळगावचे पेशकार रा. रा. नरसी यशवंत यांनीं एका कारकुनास मारलें याजबद्दल गवगवा झाला आहे.

जुडिशियल कमिशनर आफिसांतील कारकून रा. रा. हणमंत बिरेश्वर यांस हैदराबादेस वऱ्हाडचे सेक्रेटरी आफिसांत १० रुपयांची जागा मिळाली.

रा. रा. त्रिंबकराव यशवंतराव यांची एकस्ट्रा असिस्टंटचे जागीं नेमणूक हिंदुस्थान सरकाराकडून न होतां हिंदु. स.नें रेसिडेंट साहेबांस फारेन खात्यांतून ता. २९ मार्च सन मजकुरचें नं. ७१२ चे लिहिलेले पत्रांत जे अधिकार दिले आहेत त्या आधारें रेसिडेंट साहेबानीं केली असें रेसिडेन्सी आर्डरवरून समजतें.

वरूडचे रा. रा. मल्हारराव काळे यास वरुडास स्पेशियल माजिस्त्रेट नेमिलें.

इंगोलीकडील डाकेची चोरी रिसाल्यांतील घोड्यांवरील सात नोकरांनीं केली. त्यांतील १ पळाला व बाकीच्यांस मोगलाईंत शिक्षा झाल्या. चोरांनीं रोख रुपये ७०० वाटून घेतले होते व कागद पत्र आणि रजिष्टरें विहिरींत टाकलीं होतीं तीं व रुपये सर्व मिळाले.

आलिशान रेसिडेंट साहेब हवा बदलण्याकरितां अलवाल येथें गेले आहेत. हैदराबादेस पाऊस बराच असून तापाचा आजार आहे व अन्नपचन होत नाहीं. निजाम सरकारचे असिस्टंट शिक्षक मि० डावरिंग साहेब ९ वे तारखेस ज्वराचे आजारानें मरण पावले. हे तरुण असून विद्वान व लोकप्रिय होते व यांस १००० रुपये पगार होता.

मूर्तिजापुरची शास्त्रिण बाई नवरा वगैरेस विषप्रयोग करणारी जिल्हा जु० कमिशनर साहेबानीं फाशीची शिक्षा ठरविली होती तिला रेसिडेंट साहेबांनीं फाशी न देतां जन्मपर्यंत काळे पाण्यावर पाठवावें असा ठराव केला.

एलिचपुर पोस्ट आफिसचे चोरीचे बाबदींत २ असामी सांपडले केले आहेत.

पातुरास रा. रा. बळवंत शामराव देशमुख यांस हरल सब रजिस्टार नेमलें.

मुखत्यारांच्या संबंधानें पूर्वीचे नियम रद्द करून खालील नियम करण्यांत आले आहेत. कोडताच्या हद्दींत राहणाऱ्या पक्षकारांकडून ज्यांजवळ 'स्पेशल पावरस आफ अटर्नी" असेल त्यानीं कोडताच्या परवानगीनें हजर रहावें व काम करावें वगैरे. कोडताच्या हद्दीच्य बाहेर राहणाऱ्या लोकांकडून वर सांगितलेल्या तऱ्हेचे मुखत्यार आणि त्या खेरीज कुल मुखत्यारपत्र ज्यांजवळ असेल असे लोक व कोणास मुद्दाम अधिकार दिला नसल्यास कोणाच्या नावानें व्यापार चालविणारे लोक ह्म० मुनीम वगैरे अशांस कामें चालविण्याचा अधिकार आहे.

रा. रा. विठूजी नारायण यांस एथें अक्टिग हुजूर नाजर नेमिलें.

## वर्तमानसार.

इंदापुरास दोन दिवस थोडा पाऊस पडला असें वर्तमान आलें आहे.

पुण्यास श्री. रा. बळवंतराव विनायक शास्त्री पटवर्धन यांजकडेस गणपतीचे उत्साहानिमित्त मुंबईचे गवरनर साहेबाची स्वारी गेली होती.

कंदाहाराकडे सर्व शांतता आहे. तें शहर स्वाधीन ठेवावें अशी बिलायतच्या लोकांची सरकारास शिफारस आहे.

अकोला वऱ्हाडसमाचार छापखाना.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख २७ माहे सप्टेंबर सन १८८० इसवी अंक ३८

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |

डाक हाशील.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाइल

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढे दर ओळीस | ०१०१ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

NOTICE TO CONTRIBUTORS

*We invite the co-operation of all European and Native gentemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## गारुडी विद्या.

अथवा.

गौडबंगाली जादूचे मनोरंजक खेळ.

किस्येक धूर्त व ठक लोक कांहीं युक्तींच्या साधनानें अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांस ठकवितात याकरितां अशा लोकांच्या कृतीचें व कसबाचें ज्ञान सर्व लोकांस व्हावें या हेतूनें आह्मी वरील नांवाचें पुस्तक तयार केलें आहे त्यांत युरोपियन तमासगीर व एतद्देशोय जादूगारि, मांत्रिक, देवऋषि, पंचाक्षरी, इलमी, सय्यद, भानामती, गारुडी, भुत्ये, इत्यादि नांवांनीं प्रासिद्ध असलेले धूर्त, ठक व ढोंगी लोक. आह्मी जादू, भूत, प्रेत, पऱ्या, जीन, वेताळ, वीर, ह्यांच्या साह्यानें पाहिजे तें करूं शकतों असें सांगून गूढ युक्ति, हातचलाखी, लोहचुंबकशक्ति, विद्युत्प्रयोग, रसायनप्रयोग आणि वनस्पतीचे चमत्कारिक गुण इत्यादिकांच्या साधनाने अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांस कसकसे ठकवितात याचे कृतीसह स्पष्ट रीतीनें दिग्दर्शन केलें आहे. ह्याचीं पृष्ठें डेमी द्वादशपत्री साचाचीं २०० होतील व त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या ७५ पेक्षां जास्त खेळांचा समावेश होईल. पुस्तक मनोरंजक होण्याकरितां प्रत्येक खेळाची रचना गोष्टीरूपानें केली असून तत्संबंधी अवश्य लागणारीं चित्रें व आकृतीही जागजागीं घातल्या आहेत. याची किंमत सप्टेंबर अखेर देणारांस फक्त १ रुपया व मागाहून १॥ रुपया पडेल. आगाऊ वर्गणी देणारांची नांवें पुस्तकांत छापलीं जातील. किमतीबद्दल पैसा पाठविणें तो पुस्तककर्त्याकडे खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावा पुस्तकें नवेंबर महिन्यांत छापून तयार होतील. बाहेर गांवचे लोकांस ट. ख. बद्दल २ आणे जास्त पडतील.— ता. २० आगष्ट १८८० इ.

गोविंद मोरोबा कार्लेकर

पत्ता— नळावर पंचमुखी मारुतीची, गल्ली घर नंबर २६ मुंबई.

## इंद्रजालिक सर्प.

अवश्य वाचा.

अद्भुत चमत्कार

(अवश्य पहा. अवश्य पहा.)

हा चमत्कारिक सर्प प्रत्येकानें अवश्य करून पहावा. रसायन क्रियेनें तयार केलेल्या काड्या पासून हा सर्प उत्पन्न होतो. एक इंच लांब कांडीचा सुमारें ३ हात लांब सर्प होतो, आणि त्याचा रंग व आकृती वगैरे खऱ्या सर्पाप्रमाणें होते एका डबीची किंमत २ रुपये व टपाल खर्च प्रत्येक डबीस ४ आणे मिळून २। रुपये मनीआर्डर करून खालीं सही करणाराकडे पाठविल्यास रवाना करण्यांत येईल प्रत्येक डबींत एक इंच लांबीच्या २० कांड्या आहेत सर्प करण्याच्या कृती विषयीं एकंदर माहितीचा कागद डबीबरोबर पाठविला जाईल.

गोविंद मोरोबा कार्लेकर

पत्ता —नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली घर नंबर २६ मुंबई.

## पत्रव्यवहार.

या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मे. वऱ्हाड समाचारकर्ते यांस:—

सलाम अकी दिगर मजमून आपण तारीख २१ माहे जून १८८० चा अंक २४ वा या अखबारांत मानभाव यांची उत्पत्ती छापून प्रसिद्ध केली तें पाहून विस्मित आहो! बेर असो. ही दंतकथा किंवा खरी याचा मीहि शोध करीन. परंतु आपण एकाचीच उत्पत्ती लिहिली तर माझी इच्छा अशी आहे कीं तुमचे हिंदू दर्शन सहा साधु आहेत असें ऐकतों तर ते कोणकोणते व त्यांचीं नावें व भेश, कोणे रंगाचीं वस्त्रें व शास्त्रें कोणास कोणतीं मिळालीं व कशावरून प्राप्त झालीं कोणत्या कारणास्तव निरनिराळे पावून प्रसिद्धीस आले हें कृपाकरून यांचे सर्व उत्पत्तिमूळ छापून प्रसिद्ध करावें. ह्मणजे सर्वांस माहित होऊन आपले मेहरबानगीनें मला समजल कारण मला हा हे ऐकण्याचा फार सेवक आहे सबब आपणास प्रार्थनापूर्वक लिहिलें आहे. अगर हे छापून सर्व प्रसिद्ध न कराल तर तुमचे ठाई द्वैत भाव आहे असे समजलें जाईल. कळावें हा सलाम

मोर अहमद अली खा जहागिरदार

रहाणार मौजे खराळ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि आपल्याकडेस थोडासा मजकूर लिहून पाठविला आहे तर कृपा करून त्यास आपल्या पेपरा अंकीं जागा द्याल अशी आशा आहे. एथें बरसात सुरू झाल्यापासून पाऊस ह्मणण्या सारखा पडला असें नाहीं त्यांत तर आपचेवर दोन नक्षत्रांचा इतका कोप झाला होता कीं यांनीं आमचे एथील माणसें व जनावरें देशोधडीस लाविलीं. जनावरें तर चाऱ्यावाचून व पाण्यावाचून हल्लीही मरत आहेत. परंतु अलीकडे दोन नक्षत्रांची आमच्यावर इतकी कृपादृष्टी झाला आहे कीं जिकडे तिकडे पाऊसच पाऊस याचप्रमाणें जर आणखी दोन चार पाऊस पडतील तर आसपासच्या व आमच्या एथील पिकांचें उत्पन्न रुपयाचे बारा आणे होण्याची आशा आहे. मध्यंतरीं जो दोन नक्षत्रांचा कोप झाला होता त्यामुळें आमचे एथील सर्व गावकरी लोकांनीं परमेश्वराची आराधना करण्यास सुरुवात केली होती. कांहीं लोकांनीं सप्ताह उभा केला होता. कांहींकांनीं ब्राह्मण अनुष्ठानास बसविले होते व किस्येकांनीं एथें एक किंगाचेनी बोवा आले आहेत त्यांचेकडून एक महिनाभर लिंगें करविला नंतर आपापल्या शक्तीप्रमाणें सर्व देवतांची शांतता होण्याकरितां ब्राह्मणभोजन व इतर जातीस ही भोजनें दिलीं. आतां या सर्व कृत्यास कोणी तरी पुढारी असल्याशिवाय एवढी खटपट होईल असें नाहीं आमचे एथें रा. रा. लक्ष्मण रंगराव दाणे व नवीन आलेले अक्टिंग कारकून माधवराव कास्त व गणेश गोविंद ट्रेझरी कारकून आणि गंगाधर तुकदेव पोस्टमास्तर हे चौघेजण सार्वजनिक कामांत झटणारे आहेत. केवळ नुसते आंग मेहनतीनें ह्मणाल तर नाहीं, प्रसंग आला असतां पैशानें सुद्धां मदत करितात. आणि सर्व लोक त्यांचे ह्मणण्यास मान देतात. लक्ष्मणराव रा. रा. बक्तावरमल मारवाडी याचे कडून कुलमुखत्यार आहेत हे वकीलीचें काम करण्यांत उत्तम आहेत. अपिलें वगैरे चांगल्या रीतीनें तयार करितात हे कायद्यांत हुशार आहेत परंतु यांचे पाशीं वकिलीची सनद नसल्यामुळें यांचे एकंदर गुणांचा लोप झाला आहे. जर एकवार वऱ्हाडांत वकिलीची परीक्षा मराठींत होईल तर तीं त हे खचीत पास होतील. एथील सरकारी डाक्टर रा. रा. राजय्या यांचे एथें गोकुळअष्टमीचा उत्साह झाला. परदेशी ब्राह्मण व इतर पुष्कळ लोकांस भोजन वगैरे दिलें त्यांनीं आपल्या एथें देवाकरितां पागोळ्यांचे मखर वर्णनीय केलें होतें. एथील मामी तहशिलदार रा. रा. देवराव जयकृष्ण हे श्रावण महिनाभर नक्त करीत असत यंदा त नसल्यामुळें गावकरी लोकांस त्यांची फार आठवण झाली; कारण ते एथें होते तोंपर्यंत आह्मां सर्वांस त्यानीं लेकराप्रमाणें संभाळिलें. मे. मुबारकअली तहशिलदार हेही थोड्याच दिवसांत सदर्हू गृहस्थाप्रमाणें चालूं लागले आहेत. यांनीं एक महिनापर्यंत रमजानाचे रोजे धरिले होते व ईदीच्या दिवशीं सर्व गरीब मुसलमान लोकांस व इतर गरीब लोकांस कोणास कपडे, कोणास धान्य, कोणास पैसे व रुपये वगैरे पुष्कळ दान धर्म केला. यांची धर्मावर फार श्रद्धा आहे कोणाऱ्याही जातीचा भिकारी मागण्याकरितां गेला तर त्यास विन्मुख कधींन पाठवितां त्याच्या योग्यताप्रमाणें त्यास धर्म करितात हल्लीं आमचे एथें चोऱ्या फारच होऊं लागल्या आहेत जरी हल्लींचे चीफ रा. रा. मोहनसिंग हे हुशार आहेत तरी त्यांचे पाठीमागें इतर गावचें काम असल्यामुळें त्यांचें रहाणें येथें फार थोडे दिवस होतें. आणखी दुसरें एक कारण आहे की एवढा मोठा गाव असून एथें टाऊन पाचित नाहीं. तें होण्याची जर सरकार तजवीज करील तर हल्लीं जे आह्मावर संकटप्रसंग येतात ते येणार नाहींत. पत्रविस्तार फार झाला याची माफी असावी. तारीख १९ सप्टेंबर सन १८८० इसवी.

एक दारव्हेकर.

रा. रा. सुबोध पत्रिका कर्ते यांस,—

वि. वि. आपले पत्रिकेंत पेस्तर कांहीं अंकांत आत्म्याचें अस्थित्व व अमरता यांवर निबंध लिहिण्यांत आले आहेत परंतु प्रथम हा असा आत्मा शरीरांत केव्हां आला अगर उत्पन्न झाला या विषयीं कांहीं माहिती दिली नाहीं. ती कोणी देतील तर बरें. गर्भसंभवापासून प्राणी मरेपर्यंत जड देहांत प्रकृती अगर जड पदार्थांहून भिन्न वस्तूचा प्रवेश कसा व केव्हां होतो तें समजे पर्यंत जडाहून भिन्न, मरणानंतर राहणारा, व पुन्हा जन्म घेणारा असा आत्मा ह्मणून कांहीं वस्तु शरीरांत आहे असे खात्रीनें ह्मणतां येत नाहीं. ज्या बीजाचा गर्भ राहतो तें जड आहे. गर्भिणी जे पदार्थ खाते पिते तेही जड आहेत तर मग त्या गर्भिणीपासून उत्पन्न झालेले बाळकांत जडाहून भिन्न व अमर असा आत्मा केव्हां कसा शिरतो? तो गर्भांत नवीन उत्पन्न होतो असें मानिलें तर त्याचे अमरतेस, व शरीराबरोबर आत्मा मरत नाहीं ह्या ह्मणण्यास बाध येतो. गर्भ राहते समयीं गर्भबीजांत अगर गर्भाचे नऊ महिन्याच कालांत केव्हां तरी गर्भांत अगर बालक उत्पन्न झाल्या नंतर त्यांत आत्मा प्रवेश करितो असें मानिलें तर मरणापूर्वीं केव्हां पाहिजे तेव्हां त्यास शरीरांतून बाहेर कां निघतां येऊं नये? मुंबई, ९ सप्टेंबर, १८८०

सत्यशोधक.

वऱ्हाडसमाचार.

मिति भाद्रपद कृष्ण ९ शके १८०२

## नैनीताल एथें भयंकर अपघात

कालचे शनिवारच्या मागील शनिवारीं वायव्य प्रांतांत कमोन जिल्ह्यांत नैनीताल या नावाचें हवाखाण्यासाठीं नवीन बसविलेलें एक गाव आहे तेथें मोठा भयंकर अपघात झाला. व बहुत युरोपियन लोक मरण पावले हें कळविण्यास आह्मांस फार वाईट वाटतें.

तेथें अतिशय पाऊस पडला तो इतका कीं ४० तासांत २५ इंच झाला. त्यानें बहुतेक सर्व ठिकाणीं जलमय झालें इतक्यांत डोंगर खोदून केलेल्या जमीनीवर तेथें इमारती होत्या त्या डोंगरावरून पाणी शिरून डोंगराच्या एका भागाचा कडा तुटून पडला. व त्या खालीं विक्टोरिया हाटेल, असेंब्ली रूम, लंडनहौस वगैरे घरें होती तीं चिरडून गेलीं इतक्यांत ताल नावाचें तेथें मध्यावर सरोवर आहे त्याचें पाणी चढून सर्वत्र घसरलें तेणेंकरून तेथील एकंदर लोकांचा व घरांचा नाश झाला. मेलेल्या व आजारी झालेल्या युरोपियन लोकांची यादी तारायंत्रातू आली आहे तीवरून सुमार ४० लोकांची संख्या कळतें. याशिवाय नेटिव लोक कित्येक आहेत. हा नाश फारच भयंकर होय. हा गाव वसल्यास ४० वर्षे झालीं. व ताल सरोवरावरूनच याला नैनीताल असें नाव दिलेलें आहे.

---

**काबूल कंदाहार** कडील खबर आली आहे ती अशीः—नवीन अमीर अबदुल रहिमान यांस ठार मारलें व काबुलांत झोटिंग पाच्छाई माजली आहे. कंदाहारास लोक बाहेरून वस्तीस येत आहेत. सर्व बाजाराची पुन्हा सुरवात झाली. लोकांस भरवसा आला. व व्यापाराची घडामोड चालू झाली. फळफळावळ बाहेरून नित्य येऊं लागली आहे. व हवा थंड होत चालली आहे.

आयुबखानाची मायवंद एथें जी लढाई झाली तींत मारलेल्या युरोपियन लोकांचीं प्रेतें भिंतीखालीं पुरून ठेवलेलीं हल्लीं मिळालीं आहेत असें समजतें. अयूबखानाची कांहीं अधिकोत्तर खबर या आठवड्यांत नाहीं.

कंदाहारास वलीशेर महमद यांस गवरनर प्रथम नेमलेलें आहे त्यालाच कायम करावें किंवा अबदुल रहिमानाचे हवालीं तो मुलूख करावा किंवा इंग्लिश सरकारचें तेथें कायमचें ठाणें बसवावें याविषयीं निश्चयपूर्वक अजून कांहीं ठराव झाला नाहीं.

कंदाहाराकडील रेल्वे सिबीच्या पुढें थेट पर्यंत न्यावी अशा विषयीं अनुकूळ वाटाघाट या आठवड्यांत बरीच चालली आहे.

---

## गावसफाईचें बुकसक्युलर

नंबर १६ सन १८८०

अलीशान रेसिडेंट साहेब यांचे वऱ्हाडसंबंधी सेक्रेटरी याजकडून मेहरबान कमिशनर, स्यानिटरी कमिशनर, सर्व डिपुटी कमिशनर आणि सिविल सर्जन मुलूक अमानी हैदराबाद यांस

हैदराबाद रे. सा.चें आफिस ता. १ मार्च सन १८८०

मुलूक अमानी हैदराबाद यांतील गावच्या सफाईमध्यें सुधारणा करण्याकरितां खालीं लिहिलेले नियम हिंदुस्थान सरकारास पसंत होऊन त्यांनीं मंजूर केले आहेत आणि ते सर्वांस समजावे व लोकांनीं त्याप्रमाणें वागावें याकरितां प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

सन १८७८।७९ या सालांत फार लोक मेल्यावरून गावाच्या सफाईमध्यें सुधारणा व्हावी या उद्देशानें मेहरबान रेसिडेंट साहेबानीं लोकांच्या समजुतीकरितां खालीं लिहिलेल्या सूचना व नियम केले आहेत.

हे नियम जेथें गांवसफाईकरितां मुद्दाम नौकर लोक वगैरे ठेवलेले नाहींत अशा गांवांकरितां मुख्यत्वेंकरून केलेले आहेत असें समजावें ज्या ठिकाणीं अशा कामाकरित नौकर लोक वगैरे आहेत तेथील जशी स्थिति असेल त्याप्रमाणें डेपुटी कमिशनरांनीं या नियमांत फेरफार करावा किंवा कांहीं अधिक नियम जोडावे-

### सामान्य सूचना

हवा आणि पाणी यांचा अस्वच्छपणा हें रोग उत्पन्न होण्याचें मुख्य कारण होय याकरितां हल्लीं जे नियम केले आहेत त्यांचा मुख्य हेतु हवा आणि पाणी हीं स्वच्छ राखावीं असा आहे.

१ हे हेतु सिद्धीस नेण्याकरितां जे नियम केले आहेत त्यांचे दोन भाग आहेत ते असेः—

( अ ) सुखवस्तु लोकांनीं आपले घराच्या हद्दीच्या आंत पोळण्याचे नियम.

( ब ) सरकारी जाग्यांत पाटलानें आपले अधिकारानें चालू ठेवण्याचे नियम.

दुसऱ्या भागांतील नियमांचें महत्व निदान पहिल्या भागांतील नियमांइतकें तरी आहे. ज्ञाते लोकांचें असें मत आहे कीं, "हिंदुस्थानांतील सर्व गांवांत रोगाचें मुख्य बीज घरांच्या व आवारांच्या भिंतीच्या आंतल्या बाजूस असतें."

२ खानगी घरांस व आवारांस मोकळी हवा येण्यास जितकी वाट असेल तितकें चांगलें; आणि जेव्हां जमीन घाणेरडी होते आणि तिच्या पासून हवा बिघडण्याचा संभव असतो तेव्हां ती खणून काढून तेथें दुसरी माती घालावी ह्या गोष्टी महत्वाच्या आहेत आणि लोकांनीं जितकें देववेल तितकें यांकडे लक्ष्य द्यावें. या संबंधानें कांहीं सक्त नियम करता येत नाहीं. परंतु लोकानीं हें लक्षांत ठेवावें कीं दार व खिडक्या बंद केल्या ह्मणजे घाणेरडी हवा आंत राहते आणि स्वस्छ हवा बाहेरच्या बाहेर राहते. शेणानें जमीन किंवा भिंती सारविल्या तर घरांतील हवा बिघडते.

४ साधारण नियम असा आहे कीं तळीं, नाले वगैरेच्या पाण्यापेक्षां विहिरीचें पाणी चांगलें असतें आणि तें बिघडण्याचा संभव कमी असतो; या करितां जेव्हां लोक आपले गांवीं पाण्याचा पुरवठा वाढविण्याचे तजविजींत असतात तेव्हां त्यांनीं चांगली विहिर बांधण्याचा पहिल्यानें विचार करावा; परंतु ही विहिर खोलगट अथवा पाणथळ जाग्यावर, प्रेतें पुरण्याच्या ठिकाणाच्या किंवा घाणीचें पाणी सांचण्याच्या जाग्याचे नजीक, अथवा ज्या ठिकाणची जमीन कुजली असेल अशा ठिकाणीं न खणली जाईल असा बंदोबस्त करावा. विहिर खणून कांहीं उपयोग होणार नाहीं असें जेथें वाटेल तेथें तळें बांधण्याचा विचार करावा.

५ पाटील लोकांनीं असें समजलें पाहिजे कीं खालीं लिहिलेल्या नियमांची अमलबारी करण्याकरितां त्यांच्या हातून होईल तितकी त्यांस खटपट करावी लागेल, आणि हे सर्व नियम असे आहेत कीं त्यांस ते बिन हरकत अमलांत आणतां येतील. त्यांनीं गावच्या महाराकडुन सफाईसंबंधी जें काम घ्यावयाचें तें घेतलें पाहिजे आणि जागल्याचीही मदत घेतली पाहिजे. जागल्यानें स्वतः झाडण्याची जरूरी नाहीं परंतु जिकडून लोक शौचास जातात त्या रस्त्यावर सकाळीं त्यास उभें करावें ह्मणजे तो नेमलेल्या हद्दीच्या आंत लोकांस बसूं देणार नाहीं. त्यानें महाराच्या कामावर नजर ठेवावी आणि दुसऱ्या पुष्कळ प्रकारची पाटलास सफाईच्या कामांत मदत द्यावी. रेसिडेंट साहेबांचे हुकूमांची अमलबारी करण्यास आह्मांजवळ कांहीं साधन नाहीं असें पाटील लोक ह्मणतील तर चालणार नाहीं.

६ महामारीची सात चौंहोकडे ज्या वेळेस येते त्या वेळेस ती आपले गांवीं न येऊं देण्याचा हाच एक मार्ग आहे कीं हल्लीं प्रसिद्ध केलेल्या नियमास अनुसरून अगदीं बरोबर वागावें. गावांत एकदा महामारी सुरू झाली ह्मणजे ती एकदम बंद करणें हें बहुधा अशक्य असतें, तरी या बाबदींत खालीं लिहिल्याप्रमाणें सूचना केल्या आहेतः—

( अ ) खालीं लिहिलेल्या नियमाकडे दुप्पट लक्ष द्यावें.

( ब ) जत्रा, लग्नें व कोणत्याही प्रकारचे मोठे जमाव यांत जाऊं नये, आणि ज्या गावीं महामारी सुरू असेल तेथें जाऊं नये.

( क ) लांबचे प्रवास, पुष्कळ वेळ उपास आणि फार श्रम करूं नयेत व उन्हांत किंवा हवेंत फार वेळ राहूं नये.

७ ज्यास महामारीचा उपद्रव झाला आहे त्यास उपचार कसे करावे या विषयीं नियम एथें लिहिले नाहींत. ते निराळे लिहून पाठविण्यांत येतील.

८ हिंदुस्थानांत जे रोग मोठे घातकी आहेत त्यांतलाच ,, देवी " हा रोग आहे आणि याच्या योगानें प्रत्येक प्रांतांत, बहुतेक दर वर्षीं हजारो लोक मरतात.

सफाई संबंधी या नियमांत जे बंदोबस्त करण्यास सांगितले आहे त्यांच्या योगानें देवी आणि दुसरे सर्व रोग पुष्कळ अंशीं कमी होतील यांत संशय नाहीं; परंतु देवी हा रोग अशा प्रकारचा आहे कीं त्यापासून लोकांचा बचाव करण्याकरितां कांहीं विशेष निराळे उपाय करण्याची जरूरी आहे.

अनुभवानें असें सिद्ध झालें आहे कीं गाईच्या लसीच्या योगानें देवी वेळेवर काढल्या व त्या निघाव्या तशा निघाल्या तर हा रोग बिलकूल येत नाहीं.

याकरितां अशी सूचना करण्यांत येत आहे कीं सर्वांनीं ( ह्मणजे मुलें आणि मोठीं माणसें यांनीं ) हा रोग न येऊं देण्याचा हा जो सोपा मार्ग त्यापासून मरण जरी आलें नाहीं तरी पुष्कळ वेळां डोळा जातो, अवयव नाहींसा होतो आणि या प्रकारें मनुष्य जन्माचा पंगू होतो.

लोकांस कांहीं खर्च न पडतां देवी काढून घेतां याव्या याकरितां मुद्दाम तयार केलेले लोक ठेवून सरकार पुष्कळ पैसा खर्च करीत आहे.

याकरितां देवी डाक्टरांच्या कामांत पाटील लोकांनीं मदत करावी आणि आपले गावांतील पुष्कळ लोकांकडून देवी काढविण्याकरितां सर्व प्रकारच्या कायदेशीर तजविजी कराव्या अशी सरकारची इच्छा आहे.

पुढें चालू

---

## मुंबई इलाख्याची शतकी संबंधी स्थिति.

गेले ता. १६ मिनहूचें मुंबई सरकाराकडून हिंदुस्थान सरकारास पत्र गेलें आहे त्यांत मुंबई सरकारानें असें लिहिलें आहे कीं, गेले आठवड्यांत या इलाख्यांत बहुतेक ठिकाणीं चांगली पर्जन्यवृष्टि होऊन स्थितीचें मान अगदीं बदललें आहे उत्तर, मध्य आणि दक्षिण भागांतील प्रत्येक जिल्ह्यांतून अत्यंत उमेदीचे असे रिपोर्ट आले आहेत त्यांवरून भावी दुष्काळाचीं सर्व चिन्हें आतां दूर झालींसें दिसत आहे.

अमदाबादचे कलेक्टर आपल्या रिपोर्टांत असें कळवितात कीं ता० ३ मिनहूपर्यंत धारण बरीच महाग होती व लोकही बरेच विवंचनेंत पडले परंतु त्या दिवशीं अस्तमानीं व रात्रीं सतत वृष्टि होऊन सुमारें ६ इंच पाऊस पडला आतां जिल्ह्यांत पिकाची स्थिति सर्वोत्कृष्ट आहे. खेडा जिल्ह्यांतही जोराची पर्जन्यवृष्टि होऊन पिकास हितावह झाली. चांगले पीक पदरीं पडण्याची आशा आहे पंचमहालचे कलेक्टरानीं तारीख १४ मिनहूस तार केली आहे कीं ता० ३ पासून या प्रांतीं पर्जन्याची इतकी ओढ लागली कीं कित्येक ठिकाणीं पिकास त्यापासून इजाही झाली. तांदुळाचे वगैरे पीक चांगलें होईल अशी आशा आहे. भडोच जिल्ह्यांतही नुक्तीच पिकास हितावह अशी विपुल पर्जन्यवृष्टि पडून जिल्ह्यांत सर्वत्र पिकाची स्थिति सुधारल्याविषयीं तेथील कलेक्टराकडून ता. ११ चा रिपोर्ट आला आहे. अशा प्रकारचीच खात्री लायक उमेदीची सुरत एथूनही खबर आली आहे. ता. १३ मिनहूच्या ठाणें कलेक्टरकडून आलेल्या रिपोर्टांत पिकें बरीं असल्याचें लिहिलें असून तूर्त तांदुळाच्या पिकास हितावह अशी हवा असल्याचें लिहिलें आहे. हेंच पीक या जिल्ह्यांत प्रमुख होय. प्रत्यही पाऊस पडून मधून मधून ऊनही चांगलें पडतें. चोहोकडे चांगला पाऊस असून भाताचीं पिकें बरीं असल्याचा कुलाबा एथी

ल कलेक्टराकडूनही सदरील तारखेचा रिपो र्ट आला आहे.

गेल्या कांहीं दिवसांपूर्वी नगर जिल्ह्यांत व नाशीक आणि पुणें जिल्ह्याचे भागांत फारच थोडा पाऊस पडून पुढें पर्जन्यानें ताण दिल्यामुळें खरिपाचीं पिकें करपून चाललीं, गवत जळून गेलें, पाण्याचा पुरवठा उत्तरोतर कमी होत चालला व संकटावस्था ओढवण्याच्या भितीनें तेथें रिलीफ कामें सुरू करण्याची अवश्यकता दिसल्यावरून सरकारास मोठी काळजी पडली होती परंतु गेले आठवड्यांत तेथें बक्कळ पाऊस पडल्यामुळें सुदैवानें सर्व भीती दूर झाली आहे. पुणें जिल्ह्याच्या संबंधानें कलेक्टर साहेब असा रिपोर्ट करितात कीं, पेरलेलीं खरिपाचीं पिकें ताजीं होऊन नुकत्याच झालेल्या पावसानें बचावतील व धान्य सर्वोत्कृष्ट होईल परंतु पुष्कळ दिवस पावसानें टाळा दिल्यामुळें बाजरीचा कडबा मात्र कमी होईल. पाऊस थांबल्याबरोबर रब्बीच्या पेरण्या सुरू होतील व नोवेंबरच्या आंत कांहीं चांगलें पाऊस पडेल ह्मणजे सुगीहा चांगलीच होईल. आतां सरकारी रिलिफ कामें सुरू करण्याची बिलकूल अवश्यकता उरली नाहीं असें मि० रिची साहिबांचें मत आहे. नगरच्या कलेक्टर साहेबांनीं ता० १३ चा रिपोर्ट पाठविला आहे. त्यांत ते लिहितात कीं, पाऊस जोराचा झाला येणेंकरून खरिपाचीं पिकें सुरक्षित राहतील व शेतकरी लोकांस आतां रब्बीच्या पेऱ्याकरितां नांगरणी करितां येईल. रिलीफ कामांची आतां जरूरी नाहीं. धारण सवंग होत चालली असून लोक आनंदित झाले आहेत. या पावसानें नाशिक जिल्ह्यांतही स्थित्यंतर झालें. फक्त येवलें तालुक्यांत मात्र पाऊस कमी आहे. बाकीं सर्व ठिकाणीं खरिपाचीं पिकें ताजीतवानी होऊन रब्बीचे पेरे तावडतोब सुरू होतील. लोकांचें आरोग्य चांगलें आहे. लोक कोणी उठून गेले नाहींत व गुन्हेही घडत नाहींत. पूर्वेकडील तालुक्यांत पर्जन्याच्या आप्तीमुळें लोकांस जी मुख्य अडचण सोसावी लागली ती गुरांच्यां चाऱ्याची होय. परंतु सरकारी पड जमिनीवर चालू सालीं मुफत चरण्याची परवानगी देण्यांत येईल. व आतां पडलेल्या पावसानें गवताचा पुरवठा लौकरच होईल. सोलापूर जिल्ह्यांतही चोहोकडे रगड पाऊस पडला व स्थिति उमेदीची दिसत आहे. खरिपाचीं पिकें सुधारलीं, रब्बीचे पेरे सुरू झाले, आतां रिलीफ कामें सुरू करण्याची कोठेंही अवश्यकता उरली नाहीं असा कलेक्टर साहेब रिपोर्ट करितात. सातारा जिल्ह्यांतही चोहोकडे पाऊस झाल्याची खबर आहे. खरिपाचीं पिकें ११ आणे पदरीं पडण्याची आशा आहे. मजुरी करूं इच्छिणारे लोकांचा लोकलफंड कामाकडे समावेश होण्यासारखा असल्यामुळें स्पेशल रिलिफ कामें सुरू करण्याची जरूरी नाहीं. खानदेशांतही चोहोकडे आतां पुरेसा पाऊस झाला असें ह्मणतात, तूर्त गवताच्या पुरवठ्याची मात्र तूट आहे.

दाक्षिण भागांतूनही अलीकडे उमेदीचें वर्तमान आलें आहे. कानड्याचे कलेक्टर असा रिपोर्ट करितात कीं, अलीकडील पाऊस फारच हितावह झाला. पिकाची स्थिति बरी आहे. उंचवट्याच्या जमिनींवरील मात्र पिकें साधारण आहेत. एकंदरींत स्थिति समधानकारक आहे. रत्नागिरि जिल्ह्यांत बरेच दिवस पाऊस नसल्यामुळें काळजी उत्पन्न झाली होती परंतु तारीख ४ मिनहू पासून चोहोकडे पाऊस होऊन आतां स्थिति बरीच सुधारली आहे. लोकलफंड व आंबेघाट रस्त्याचीं कामें तावडतोब सुरू करण्याविषयीं कमिशनर साहेबाकडून सूचना अल्यावरून या कामावर पुष्कळ गरिब लोकांचा गुजारा होईल, स्पेशल रिलिफ कामें सुरू करण्याची जरूर नाहीं. गेले आठवड्यांत पडलेले पावसानें जिल्ह्यांत बरीच सुधारणा झाल्याविषयीं ता. १३ मिनहूचा बेळगाव येथील कलेक्टरांनींही रिपोर्ट केला आहे. भातांचीं पिकें बचावलीं जाण्यासारखा वेळेवर पाऊस पडला नाहीं. यामुळें त्या पिकाचें कांहीं अंशीं नुकसान होणार आहे; परंतु इतर पिकें चांगली होण्याची आशा आहे. मि. वांडिंगटन कलेक्टर साहेबांस रिलिफ कामें सुरू करण्याची जरूर दिसत नाहीं. धारवाड व कलादगी जिल्ह्यांतही चांगले पाऊस पडून स्थिति सुधारल्यामुळें तेथील कलक्टरांसही रिलिफ कामें सुरू करण्याची जरूर दिसत नाहीं.

सुदैवानें या इलाख्यांताल स्थितींत एकाएकी असा फरक पडल्यामुळें नामदार मुंबई सरकारासही तूर्त रिलिफ कामें सुरू करण्याची किंवा धान्याचा साठा किती बाहेर काढण्यासारखा आहे त्याची माहिती मिळविण्याची जरूर नाहीं. असें वाटत असल्याचे व दुष्काळाचें सर्व भय नष्ट झालें असें ह्मणत असल्याचे त्यानों हिंदुस्थान सरकारास कळविलें आहे.

---

The recent outburst of rain has secured a bumper grass crop and the Kharif will in all probability bear a 12 anna crop if not a one Rupee one. The prices of grain have run down rapidly which is beneficial to the laboring class but not so to the "banias." The Morna has come down in rapids rather frequently and all alarm that had hitherto existed is entirely subsided in reference to the water supply. It is indeed an invaluable blessing that there is no more reason to fear the failuer of potable water this year. The late rain though it has warded off a cholera epidemic has produced a malarious fever among the masses and ther eare few houses which do not contain its sick inmates. We lately remarked on the unusually extraordinary large No. of deaths in Berar (Viz. 82000 during 1879) resulting from feve rand while cholera with its rapid stages carries havoc, producing alarm in the minds of even the bravest. this syrenic disease (fever) slowly and surely carries away more victims than the dreaded cholera. At present fever has not carried away many (if any) lives this year as far as we have had opportunities of observing its marches, the type being a mild one. It is hoped that it will not leave behind it sad reminiscences of its advent.

---

Candahar is now absorbing all attention. The attempt to hold it through a friendly prince has signally failed and it is a question whether it will be attempted again. The possession of Candahar will necessitate a strong British garrison at an enormous expense being maintained and may be a sure prognostication of a rupture with the Ameer of Cabul eventually. This may operate as a reason for evacuating Candahar but again Herat is not under the sway of the Ameer of Cabul whom we have placed on the throne. Ayub is a claimant for the throne of Cabul and therefore Abdul Rahman's rival. General Skobeleff is strongly urging an advance on merv. If this be sanctioned at the Lividia Council of war by the Czar, it will be Russia's interest to support Ayub Khan at Herat and this alone would be a strong reason for not abandoning the advanced position, for any move of Russia in this direction will be a menace to India and to British interests. It is rumoured that the Queen has telegraphed to the Viceroy that Ayub Khan is to be pursued and a price to be put upon him or on his capture. It will be welcome news if true but possibly sithe rumour coming to us is not founded on facts. The capture of Ayubkhan would leave us secure from any further aggression from the direction of Herat while his escape would make him a tool in the hands of the Russians and he will be a trump card in their hands for any intervention they may chose to make hereafter.

---

The recent decision of the authorities to admit English-speaking natives into Volunteer corps at Madras and its Vicinity, has suggested to a correspondent, Civis. [of the Times of India] the desirability of a similar privilege being extended to the Parsis of Bombay. Civis dwells on the loyalty of the Parsis to the British rule, and urges that if there is one caste or Community who more than another are entitled to the honor of bearing arms for the Queen, they are "the sons of the ancient, Guebers [Persians] the descendants of the Kings, Kaikaoos and Kaikhoshroo, once the conquerors of the ancient known world." We need not inform our readers that the Parsis of Berar are already enjoying the privilege hat is asked for by the above correspondent!

---

It is stated that things are sold very dear at Khundahar at present.

---

A few days ago at Simla, His Excellency, the Marquis of Ripon, Governor General, while proceeding on a pedestrian excursion, is said to have noticed the Police engaged in keeping the way clear of the crowd, when he gave vent to a noteworthy remark to the effect that roads were for the Public, rich as well as poor, and that they had perfect liberty of freedom and that passersby were not to be molested under any circumstances. Very generous indeed!

---

## वऱ्हाड

मे० जोन्स साहेब कमिशनर तीन महिन्यांच्या रजेवर शुक्रवारीं विलायतेस जाण्याकरितां मुंबईस गेले. गुरुवारीं एथें आले होते.

---

कर्नल वेल साहेब जुडिशियल कमिशनर यांस मे० जोन्स साहेब परत येईपर्यंत अक्टिंग कमिशनर नेमिलें. व कर्नल. वुशबी सा० बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर यांस अक्टिंग जुडिशियल कमिशनर नेमिलें.

---

मि० किटूस साहेब खानेसुमारीचे कांहीं व्यवस्थेकरितां वाशिमास गेले होते ते परत आले.

---

अडगावास एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर आफिसचे ७५ रुपयांचि शिरस्तेदारीच जागेवर जळगावाहून रा रा. नरसो यशवंत यांस डिपुटी कमिशनर साहेबांनीं पाठविले होते परंतु ती नेमणूक जुडिशियल कमिशनर साहेबास पसंत झाली नाहीं. ते दुसरे कोणास नेमणार आहेत. एकस्ट्रा आफिसच्या शिरस्तेदारीच्या जागा भरण्याचा अधिकार जुडिशियल कमिशनर साहेबांचा आहे डिपटी कमिशनर साहेबानीं त्यांत हात घालीत जाऊं नये असें सर्क्युलर झाल्याचें ऐकतों.

---

देवीखात्यांतील सुप्रिंटेंडेंटची एक जागा रिकामी होती व तिजवर गुदस्त साली एक मुसलमान गृहस्थ काम करण्यास योजिले होते. परंतु त्यानीं तुपाच्या मशाली लावण्यासारखीं अनन्वित कामें केल्यामुळें स्यानिटरी कमिशनर साहेबांनीं त्यांना त्या जागेवर कायम केलें नाहीं. व रा. रा. त्रिंबकराव पांडुरंग कजवाडकर स्यानिटरी आफिसांतील ६० रुपयांचे क्लार्क यांस ७० रुपये करून सुप्रिंटेंडेंट केलें. ही नेमणुक फार चांगली झाली. त्रिंबकराव हुशार आहेत व त्यांस बढती मिळाली हें ऐकून आह्मांस संतोष वाटतो. यावर्षी ते साहेबाबरोबर स्वारींत राहातील व स्वारीबरोबर असलेले सुप्रिंटेंडेंट रा. रा. बापुजी यादव हे जिल्ह्यांत कामावर जातील. त्यांस उमरावती जिल्हा दिला असें समजतें.

---

बुलढाण्याचे क्लार्क आफ धि कोर्ट मि० एदलजी जमशेटजी रजेवरून आपले कामावर रुजू झाले व रा. रा. गणेश बापुजी परत आले. त्यांस जुडिशियल कमिशनर आफीसचे ७५ रुपयांचि डिपुटी क्लार्कचे जागेवर नेमणार. तूर्त त्यांनीं दीड महिन्याची रजा घेतली आहे. व ते वाशिमास गेले आहेत.

---

जळगावास नायब तहशिलदारीवर मि० हुदामिया बाळापुरच्या मौलवी साहेबाचे नाबई यांस नेमिल्याचें समजतें.

गेल्या जुलई महिन्यांत मुंबई बंदरांतून १९,८६,५५४ रुपयांचे गहू बाहेर प्रदेशीं गेले.

अफगाणिस्थानची माहिती देण्याकरितां सर स्तुवर्ट यांस मुद्दाम सिमल्यास बोलाविलें आहे.

अतिशूद्र जातीचीं मुलें शाळेत घेण्याबद्दल सरकारी हुकूम असल्यामुळें सुरत व अमदाबाद येथील वर्तमानपत्रें गवगवा करीत आहेत.

गेल्या बडोदाप्रकरणांत वडोद्याचे शिक्के पैकीं जी रक्कम मुंबई ब्यांकेंत ठेविली होती ती नर्मदेचें पाणी आणण्याचे कामीं खर्च करण्याचे हेतूनें परत मागितली असतां तें मागणें अमान्य झाल्याची खबर बाहेर पडली आहे. ब्यांकेंत पैसे ठेवणें ह्मणजे पेटींत ठेव ठेविल्याप्रमाणेंच समजावयाचें व हे पैसे हवे तेव्हां खर्चास मिळतात! !

मि० श्रीधर विठ्ठल दाते यांस दक्षिण हैदराबादेस प्रायवेट सेक्रटरीची जागा मिळाल्याचें जें वर्तमान आलें होतें ते अगदीं मिथ्या असे आतां कळतें. ते एका सरदाराची जहागीर जप्त झाली होती त्या खटपटीकरितां तिकडे गेले होते.

म्हैसूर प्रांतांत यंदा अति वृष्टी झाल्यामुळें शेतें जाया झाली आहेत.

सोलापुर— पर्जन्यानें तर लोकांस पुरें पुरें करून सोडलें आहे. गुरुवार व शुक्रवार हे दोन दिवस पर्जन्यानें उघाडी दिली होती व दिवसा उन्हाचा ताप व रात्रीं स्वच्छ चांदणें पडत होतें त्यामुळें लवकरच वापसा होईल अशी शेतकरी लोकांस आशा उत्पन्न झाली होती पण कालपासून पुनश्च पूर्ववत पर्जन्यास सुरवात झाली आहे. आतां दोन दिवस मेघराज विश्रांति घेतील तर फार उत्तम होईल असे लोकांचे उद्गार निघूं लागले आहेत. फक्त गेल्या आठवड्यांत (गुरुवार व शुक्रवार खेरीज करून) एथें ७.८१ पर्जन्य पडला. तलाव भरून खंदकही भरला. व नवे पेठेंतून पाणी वाहूं लागलें आहे.

रा. ब. रंगराव भिमाजी डि. डे. कलेक्टर यांचा वर्ग बेळगावास होऊन रा. ब. बाळकृष्ण देवराव यांचा वर्ग अहमदनगर एथें झाल्याबद्दल सरकारी ग्याझेटांतून प्रसिद्ध झालें आहे.

अहमदनगर एथें पर्जन्य राजाच्या कृपेनें बहुत आनंद झाला आहे. ता. १० मिनहूपासून ता. १९ मिनहूपर्यंत तेथे ६॥ इंच पाऊस पडला.

म्या० सि०

अफगाणिस्थानांत जे लोक पडले त्यांच्या मुलामाणसांच्या पोषणाकरितां जो फंड जमा होत आहे त्यास कोल्हापुरचे कारभारी रा. ब. माहादेव वासुदेव बर्वे यांच्या कडून ६१०० रुपयांची भर पडली असें समजतें. या रुपयांपैकी ३००० रुपये महाराजांच्या नांवानें, १०० रुपये विशाळगडकर यांच्या कडून आलेले आहेत. त्याचप्रमाणें १०० रुपये बावडेकर, ५०० रुपये कागलकर, २०० रुपये इचलकरंजीकर, १०० रुपये सरलष्कर बहादूर; १०० राजोपाध्याय. ५०० रु० मुधोळकर, १००० रुपये मिरजमळेकर अशा संस्थानिकांकडून रकमा घेण्यांत आल्याचें समजतें.

मायकेल डेव्ही नांवाच्या गोऱ्यानें एका नेटिव औरतेचा खून केल्यावरून त्यास जस्टिस स्टेट साहेबांनीं जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा दिली. ती शिक्षा देण्याचे वेळीं त्यांणी जो निकाल दिला त्या निकालाचे वेळीं कैदीस असें सांगितलें कीं, "तूं इंग्रजी शिपाई असून मोठ्या क्रूरपणानें गरीब, निराधारी व अनाथ अशा बाईचा खून करावा हें फारच लाजिरवाणें आहे या देशांतील नेटिवांचें रक्षण करावें व नेटिव लोकांकडून आपल्यास मान सन्मान मिळवून घ्यावा व ते आपला हुकूम मानतील असें करावें एवढ्या करितां तुला विलायतेहून या देशांत पाठविला होता. ती गरीब बाई तुला साहेब समजून तिनें तुला पुष्कळ मान दिला व ती भ्याली. तीच जर तुझ्या देशांतील एखादी बाई असती तर तिनें तुझी खरडपट्टी काढून तुझ्या तोंडास काळेखी लागेल अशी तजवीज केली असती. तूं जो हा भयंकर खून केलास याच्याबद्दल राणी सरकारच्या निःपक्षपाती कायद्याप्रमाणें तुला देहांत प्रायःश्चित्त योग्य होते, पण पुराङ्गाच्या कमताईमुळें येथें तुझ्याच जातीचे ज्युरर बसले आहेत त्यांच्या मनांत तुझ्या अपराधाचें खरें स्वरूप न उतरल्यावरून निरुपायानें मी तुला जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा देतो.,,

रा. रा. अण्णा साहेब पटवर्धन प्रसिद्ध सांगलीचे माजी कारभारी हे गेल्या आठवड्यांत काशीयात्रेस गेले

कृष्णाजी काशिनाथ अमि० स्टेशनमास्तर पाटस यांनीं लाईनक्लियर घेतल्याशिवाय गाडी सोडल्याबद्दल त्यास ६ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

पुणें या आठवड्यांत एक दोन पाऊस फारच उत्कृष्ट पडल्यामुळें सर्व लोकांच्या तोंडावर तजेला दिसत आहे. पुणे जिल्ह्यांत बहुतेक सर्व ठिकाणीं पर्जन्य पडला असल्यामुळें कठाणचें पीक तरी हातीं लागेल असा अदमास आहे, पण एवढ्यावरून दुष्काळ नाहीं ह्मणून रिलिफ कामें तहकूब करण्यास सांगणें हें मात्र बरोबर दिसत नाहीं.

इंदूर येथील होळकर सरकारचे रिसाल्यांतिल एक अम्मलदार गेल्या मंगळवारीं आपल्या घरीं निजलेले असतां पाहाऱ्यावरील मनुष्यानें त्यांचे प्रजोत्पादनाचे अवयव मुळापासून वस्तऱ्यानें कापून टाकिले गुन्हेगार इसम जातीचा कनूजा ब्राह्मण असून रिसाल्यांतच बारगीर होता. त्याचें ह्मणणें असें ऐकतों कीं, सदहू अम्मलदार यांनीं सृष्टिविरुद्ध संभोगाविषयीं माझी छेडखानी केल्यामुळें मी हें कर्म केलें. सदर अम्मलदार जातीचे मुसलमान असून त्यांची उमर पंचावन साठ वर्षांची आहे. त्यांजला दोन मुलगे असून पत्नी हिंदुस्थानांत आहे. गुन्हेगार हल्लीं कैदेंत आहे. चौकशींत काय निष्पन्न होतें तें पहावें मुद्देमालापैकीं वृषणाच्या गोळ्या मांजरानें उचलून नेल्या ह्मणून समजतें.

श्री. तात्या साहेब व रा. ब. देशपांडे सांगली संस्थानचे कारभारी यांचे दरम्यान सन १८७२ रांतील मुंबईचे स्वारीपासून आलेला बिघाड सर्वांस माहित आहेच. त्यापासून कसकशी व कायकाय संकटें संस्थानचे मालकांस व प्रजेस प्राप्त झालीं तीं आपल्या व इतर मुंबई वगैरे ठिकाणचे वर्तमान पत्रांतून प्रसंगोपात वाचकांचे नजरेस आलींच आहेत. हल्लीं लिहिण्यास आनंद वाटतो कीं, परवा श्रीगणेश चतुर्थी दिवशीं श्रीमंताची व रा. ब. यांची भेट झाली व एकमेकांची थोडा वेळ सुरस भाषणें होऊन दिल साफ झाले. याप्रसंगीं श्रीमतांनीं राववहादुरास बोलावून त्यांचें मन संतोषविलें ही गोष्ट बहुत जनांस पसंत झाली आहे. याचप्रमाणें आमचे राव बहादुर हरतऱ्हेनें श्रीमंताचें मन तोषवून दौलत घोटाळ्यांतून मुक्त करतील ही आशा सर्वांस उत्पन्न झाली आहे.

आयूबचा जो सरदार पकडल्याबद्दल प्रेस कमिशनर कडून नुकतीच बातमी आली आहे तो सांगतो कीं, इंग्रजा बरोबर लढावें अशी अयुबची मर्जी नसून फक्त कंदाहार लुटण्याची त्याची इच्छा होती, पण ज० ब रोच्या फौजेनें त्यावर हल्ला केल्यामुळें त्यास लढणें भाग पडलें. दुसऱ्या लढाईच्या वेळीं इंग्रजाशीं न लढण्याबद्दल आह्मी त्यास सांगत होतो. त्याणें तें ऐकिलें नाहीं. हा सरदार ४० वर्षांपूर्वीच्या लढाईंत तोफखान्याकडे होता.

मागें रामचंद्र ह्मणून कोणीं पुरुष रशियांत आहे असें प्रसिद्ध झालें होतें तो रामचंद्र प्रसिद्ध नानासाहेब यांचा मानलेला पुत्र आहे असें एक बातमीदार कळवितो.

मुंबई— गेल्या आठवड्यांत पावसानें खूपच गर्दी केली. कालपर्यंत एकंदर सुमारें १० इंच पर्जन्य पडला. आतां त्यानें थोडी विश्रांति घ्यावी असें वाटूं लागलें. इकडल्यांतही बहुतेक ठिकाणीं चांगला पर्जन्य पडल्याचें वर्तमान समजतें. सबब दुष्काळाची भीति नाहींशी झाली ह्मणण्यास हरकत नाहीं.

चक्रवर्तिनी विक्टोरिया राणी गादीवर बसल्यापासून आजपर्यंत त्यांस मिळालेल्या नजराण्यांची यादी स्वतः तयार करीत आहेत आणि लहान मोठ्या सर्व देणग्यांचीं चित्रें त्यांस हास्तल करण्याचा त्यांचा विचार आहे असें फ्रें. इं. वरून समजतें. हा ग्रंथ बराच मोठा व मनोरंजक झाल्यावांचून राहणार नाहीं.

साताऱ्यास थोड्या दिवसांपूर्वीं एका नाटक मंडळीनें रासक्रीडेचा खेळ केला तेव्हां कृष्णाचे स्वरूपास मोहित होऊन एका स्त्रीस मूर्छा आली. तिला शुद्धीवर आणण्यासाठीं तिच्या नवऱ्यानें होता तेवढा इलाज केला. तरी सावध न होतां ती बाई मरण पावली असें एक बातमीदार सूर्योदयात लिहितो. तखड्डी कृष्णाचा हा प्रताप! तर खऱ्या कृष्णानें १६ सहस्र गोपी वश केल्या यांत आश्चर्य कोणतें ! ! !

राशियन लोक मध्य एशियांत किल्ले वगैरे बांधीत आहेत आणि चीनच्या सरहद्दीकडे पुरवठा पाठवीत आहेत. तसेंच त्यांनीं बामी येथील सैन्यावर कर्नल सेरी बिस्कीं यांस कमांडर नेमिल्याचें तारीख ११ सप्तंबरच्या सेंट. बर्गच्या तारेवरून समजतें.

अमेरिकेत यंदा कापसाचें पीक उत्तम आलें आहे कारण कापूस पिकणाऱ्या दह प्रांतांची सरासरी काढली ती शेकडा ९१ आली.

ने. ओ.

तपस्वी बाईसाहेब—या नांवाची एक हिंदुस्थानी बाई सुमारें ३१ वर्षांच्या वयाची मुंबईस माधवबागेच्या धर्मशाळेंत हल्लीं उतरली आहे. या बाईस संस्कृत, उर्दू, मराठी, कानडी, तैलंगी आणि इंग्रजी इतक्या भाषा येतात. कोणीही गेला असतां ही भेटते.

पाण्यावरून चालण्याची युक्ती—अमेरिकेंत मिस्तर सोल नावाच्या गृहस्थानें पाण्यावरून चालण्याचे जोडे केले आहेत ते त्यानें घालून तेथल्या एका नदींत चालून दाखविलें. हे जोडे जस्ताच्या पत्र्याचे केले आहेत त्यांची लांबी पांच फुट असून रुंदी दाहा इंच व खोली पांच इंच आहे.

---

## आरोग्यशास्त्र.

लोणी— हा फारच उपयोगी व पुष्टिकारक पदार्थ आहे लोणी कढवून त्यापासून तयार केलेल्या तुपाचा आमच्या लोकांत नितका खप आहे तितका इतर कोणांत नसेल. लोक तर तूप खाण्याविषयीं प्रख्यात आहेत इतकेच नाहीं तर सशक्त होण्यास तुपासारखा दुसरा पदार्थ नाहीं अशी बहुतेक लोकांची समजूत आहे. ह्मणून कित्येक तुपाचे गोळेच्या गोळे प्रयत्नी गिळतात. परंतु ही मोठी चूक आहे. कारण आपण उष्ण देशांतील रहिवासी असल्या कारणानें अंगांतील ऊन सतत सारखी ठेवण्यास कारवान विशेष असणाऱ्या पदार्थांचें सेवन फार करण्याची जरूरी नाहीं. ते पदार्थ समशीतोष्ण किंवा शीत कटिबंधांत रहाणाऱ्या लापंलडादि देशांतील लोकांसच योग्य. हे लोक चरबी खाण्यांत इतके वस्ताद असतात कीं मेणबत्या देखिल त्यांस पुरत नाहींत व तितक्याची त्यांना जरूरीही असते. यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, तूप मुळींच न खाल्यास चालेल. तूप किंवा तुपासारखे तेलादि पदार्थ नेहमीं सेवन केलेच पाहिजेत. न केल्यास शरीर पुष्ट व निरोगी स्थितींत रहाणार नाहीं. ह्मणून प्रत्येक मनुष्यानें दर दिवसास सुमारें दोन पासून तीन तोळे तूप भोजनाबरोबर खाणें अवश्य आहे. पचण्यास उत्तम ह्मटलें तर लोणी होय. त्याच्या खालोखाल तूप व तेल. लोण्यांत पाणी शेकडा ५ पासून १० भाग पर्यंत असतें. वजन वाढण्याकरितां व्यापारी लोक ते पाण्यांत भिजत ठेवतात. लोण्यांत दह्याचा अंश थोडाबहुत तरी असतोच. तो जितका कमी असेल तितकें चांगलें होतें. लोण्यापासून शेकडा ८१ पासून ९२ पर्यंत उत्तम तूप निघतें तुपाचा वास व स्वाद चमत्कारिक असतो व जे नेहमी चांगलें तूप खाणारे आहेत ते फक्त वासावरूनच चांगलें किंवा वाईट याची परीक्षा करितात. फार वास येणाऱ्या तुपांत बहुधा थोडा बहुत जनावरांच्या चरबीचा अंश असतो. तुपाचा रंग थोडा पिवळट असतो. परंतु रंगावर फारशी त्याची परीक्षा नाहीं. कारण ज्या लोण्यापासून तूप केलें असेल त्याचा जसा रंग असेल त्याप्रमाणें तुपाचा रंग निघतो बाजारांत हळद चोळून तुपाला पिवळट रंग देतात. पीठ व खडू इत्यादि पदार्थांचें मिश्रण विकणारे लोक करतात. ही लुच्चेगिरी तूप कढवलें ह्मणजे लागलीच उघडकीस येते.

मु० प०

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.